

# जॅक्सन...
# Jackson!

(दोन अंकी नाटक)



डॉ नितिन मोरे

# जॅक्सन .. जॅक्सन!

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# जॅक्सन .. जॅक्सन!

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

**पण**

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# जॅक्सन .. जॅक्सन!

लेखक: डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

Cover: Chaitanya Chavan

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २२ फेब्रुवारी २०२१

©esahity Pratishthan®2021

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यत: आजूबाजूच्या दैंनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे अठ्ठाविसावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo. com

# जॅक्सन .. जॅक्सन!

## अंक पहिला

प्रवेश १

एका घराचा दिवाणखाना. तिकडे आजूबाजूला जुन्यापुराण्या वस्तू मांडून ठेवलेल्या. वरील दिवे पण जुन्या काळातले. सजावट जुन्या जमान्यातली जाणवावी अशी. बाजूला स्टडी रूम तिथे सध्या अंधार आहे. मागून आवाज..

अदृश्य सूत्रधार :

हे आहेत पुरातत्त्व शास्त्रातील नामांकित प्रोफेसर डॉक्टर मोहन बारशिंगे यांचे घर. खरेतर वाडा. बारशिंगे सर मॉडर्न कॉलेजच्या एन्शंट विभागाचे प्रमुख. म्हणजे नाव मॉडर्न कॉलेज. शिकवतात पुरातन कालीन गोष्टी. इतिहास आणि संशोधन यांनी डोके व्यापून घेतलेले डॉक्टर बारशिंगे राहतात पण मनाने इतिहास कालात. पुरातत्त्व खात्यात आहेत पण स्वतःला इतिहासाचे तज्ञही मानतात बारशिंगे. आपल्या बारशिंगे आडनावाचा त्यांना कोण अभिमान. कारण? एकदा उत्खननात सापडलेला बाराशिंगी प्राणी. प्राणी म्हणजे प्राण्याचे मुंडके नि त्यावरची बारा फांद्या फुटल्यासारखी शिंगे. पण त्याच्यावरून आपले आडनाव असावे याचा त्यांना अगदी एखाद्या प्राचीन काळी राजाने बारशिंगे पदवी दिली असावी त्यांच्या पूर्वजांना असा अभिमान. जमिनीखाली सापडतात पुरावे

म्हणून सदैव खाली बघत जमिनीकडे पाहात चालायची सवय आहे त्यांची. डोक्यावर हॅट घालणाऱ्या काही निवडक मंडळींपैकी एक डॉ. बारशिंगे. ही हॅट तशी जुनी झालीय, पण आपल्या कामानुसार जुने तेच सोने हा बारशिंग्यांचा बाणा. त्यामुळे तशीच चेपलेली हॅट घालून ते फिरत असतात. त्या हॅटमुळे कॉलेजातली वात्रट मुले त्यांना टोपीवाला म्हणतात ह्याचा मात्र पत्ता नाही त्यांना अजून. असता तरी म्हणाले असते, कॉलेजातलीच मुले.. वात्रटच असायची. पिढ्यान पिढ्या हेच होत आलेय. अगदी हडप्पन संस्कृतीतही मुले वात्रट असल्याचे पुरावे सापडलेत मला..

प्रकाश हळूहळू बाजूच्या खोलीवर..

प्रोफेसर मोहन बारशिंगे आपल्या टेबललॅंपच्या प्रकाशात लिहित बसलेले. हातात एक भिंग मोठाले घेऊन. डोक्यावर घड्याळ रिपेअर करणारे घालतात तसे अजून एक भिंग. लिहिता लिहिता भिंग काढायला विसरलेले. त्यामुळे हातात पेन घेऊन लिहितात पण दिसत काहीच नाही. त्यामुळे वैतागून पेन बाजूच्या कोऱ्या पानावर खरडतात. मग झटकतात. त्यांच्या फाऊंटन पेनातून शाई उडून शर्टावर पडते. निळे डाग हाताने पुसण्याचा प्रयत्न

करतात. मग कंटाळून पेन टाकून देतात. तोच डोळयावरच्या भिंगाची आठवण येते. ते काढून ठेवतात. एकाएकी दिसायला लागते.. कागदावर लिहायचे सोडून जवळील कवटी हातात घेऊन बोलू लागतात ..

प्रोफेसर : ही कवटी म्हणजे मोहंजोदडोमधील शिक्षण व्यवस्थेत प्राध्यापकांचे स्थान दाखवणारा पुरावा .. मिळालेल्या कवटीच्या अवशेषातून दिसते की हा मनुष्य प्राध्यापक असावा .. मेंदूचा आकार बाकी कवट्यांहून मोठा दिसत आहे.. यावरून ह्याच्या आत प्राध्यापकीय मेंदूच असावा असे दिसते.. दात दोन शाबूत आहेत.. बाकीचे पडलेले असावेत.. किंवा काढले असावेत. त्यावरून तेव्हा दंत तज्ञही असावेत.. ह्या माणसाच्या कवटीच्या कपाळावरही आठ्या पडलेल्या दिसत आहेत.. नक्कीच .. नक्कीच हा मनुष्य लग्नाळलेला असावा.. आणि खालचा जबडा नाही .. घरगुती भांडणात थोबाड फोडले गेले असावे. त्यात अंत झाला असावा.. म्हणजे तत्कालीन संस्कृती कित्येक वर्षापूर्वीही आजसारखीच असावी..

आतून पार्वतीबाई बारशिंगे तरातरा चालत येतात. येताना बाजूचे काही अँटिक पीसेस पडतात .. त्याचा आवाज ऐकताच प्रोफेसर बाहेर येतात ..

प्रोफेसर : अगं हे काय? पाडलेस माझे दात?

पार्वतीबाई : तुमचे दात? दिसताहेत की जागेवर ..

प्रोफेसर : हे नाहीत .. ते किती शतकांपूर्वीचे दात.. मी जपून ठेवतोय नि तू..

पार्वतीबाई : हॅत्तिच्या. जुनेपुराणेच तर आहेत! दातासारखे दात मेले. दाखवायचेच तर आहेत, खायचे थोडीच आहेत ते! आणि कवटी घेऊन कुठे फिरताय? जादूटोणा नि वशीकरण विद्या शिकायला नाव घातलेत की काय?

प्रोफेसर : पार्वती, काय वाट्टेल ते बोलू नकोस. एवढया मोठया आर्कियालॉजिस्टला तू बाबा बारशिंगे बंगाली बनवू पाहातेस?

पार्वतीबाई : काय हरकत आहे? पगाराहून जास्त कमाई होईल नि ते दिवस चे दिवस कवट्या नि हाडे चघळत बसणे नको..

प्रोफेसर : चघळत?  मी तुला श्वानवंशीय चतुष्पाद वाटतोय?

पार्वतीबाई : नाही. मला किनई कुत्रे फार आवडतात.. पाळू दिला नाही तुम्ही म्हणून ..

प्रोफेसर : अर्थातच. त्या शेपूट हलवत हाडके चघळणाऱ्या जमातीतील कुणास आपल्या वाड्यात कसा आणू देईन मी? तो माझ्या हाड संग्रहातील हाडे चविष्ट समजून चघळत बसला तर माझ्या इतक्या वर्षांतल्या व्यासंगाचे काय होईल?

पार्वतीबाई : डोंबलाचा व्यासंग! हाडे आणि सापळे घेऊन बसा नि त्याला व्यासंग म्हणा!

प्रोफेसर : तुला नाही समजायचे ते..

पार्वतीबाई : नाही समजत तेच बरेय.. चांगले छान विदेशी कुत्र्याचे पिलू आणले असते .. दुडूदुडू धावले असते घरभर.. त्याच्या नखांनी त्याने बोचकारले असते.. आणि किती गोड भुंकला असता तो.. ब्हो ब्हो ब्हो ब्हो.. मग मोठा होईल माझा अल्सेशियन.. भुंकेल तो ब्हो ब्हो ब्हो ब्हो ..

प्रोफेसर : ब्हो ब्हो? भो भो नाही?

पार्वतीबाई : छे! गावठी नाही. विदेशी कुत्राय. उच्चार कसे स्पष्ट. देशी नाहीत. गावठी. भो भो म्हणे.. मी तर नावही ठरवून ठेवलेले.. जॅक्सन!

प्रोफेसर : कुत्र्याचे नाव? जॅक्सन?

पार्वतीबाई : अर्थात. जॅक्सन. मस्त आहे ना नाव. त्या बारबुडीणीच्या कुत्र्याचे नाव काय तर प्रद्युम्न! गावठी. आणि तिचं कुत्रं पण गावठीच.

प्रोफेसर : म्हणजे भो भो .. ब्हो ब्हो नाही..

पार्वतीबाई : कसं का असेना.. बारबुडणीकडे आहे तरी कुत्रा. नाहीतर मी. मलाच मेलीला अक्कल नाही म्हणून सांगत फिरते.. पुत्रा काळू, पुत्रा काळू म्हणून..

प्रोफेसर : म्हणजे कुत्रा पाळू..?

पार्वतीबाई : तेच तर बोलतेय मी. पण नाही. बोलून काय फायदा.. बायको सांगतेय ना. सोबतीला झाला असता चांगला. तुम्ही आणू देत नाही ..

प्रोफेसर : सोबतीला? मी आहे ना..

पार्वतीबाई : तुम्ही .. पण जॅक्सनची सर तुम्हाला कशी येणार?

प्रोफेसर : मला? आणि जॅक्सनची सर?

पार्वतीबाई : अर्थात. मी त्याच्याशी बोलायची इंग्रजी वाक्ये पण पाठ केलीत.. जॅक्सन कम हिअर.. जॅक्सन गो देअर.. चला मी गो देअर करते.. तुम्ही काय मला कुत्रा पाळू देत नाही .. बघेन बघेन नि निघून जाईन..

प्रोफेसर : खरंच..? (एकाएकी टोन बदलत) खरंच नको जाऊस ..

पार्वतीबाई : मी जाणारच ..

प्रोफेसर : कुठे निघालीस..?

पार्वतीबाई : ही चालले मी. मला कुणी अडवू नाही शकणार.. ही चालली मी..

प्रोफेसर : नकोस जाऊ..

पार्वतीबाई : जाणारच मी..

प्रोफेसर : पुरातन कालीन संस्कृतीचा विचार करता पत्नी हे पतीचे अर्धांग आहे.. तेव्हा हे हाफ बॉडीणी म्हणजेच अर्धांगिनी.. नकोस जाऊ.. जाऊ नकोस..

पार्वतीबाई : तुम्ही बसा त्या सटवीला कवटाळून.

प्रोफेसर : सटवी ? म्हणजे कोण?

पार्वतीबाई : हीच.. तीच.. या टवकीला टवकाळून.. नाही कवटीला कवटाळून बसा ..

प्रोफेसर : सटवा आहे हा..

पार्वतीबाई: असेल.. मी निघाले ..

प्रोफेसर : कुठे..

पार्वतीबाई: किचन मध्ये ..

( तरातरा निघून जाते )

प्रोफेसर : (कवटीशी खेळत) कवट्या, ऐकतोस ना. पार्वती वैतागलीय. का वैतागलीय? तुझा विश्वास बसतोय? ती आली होती लग्न ठरले तेव्हा आमचे. तेव्हा मला बघायला आलेली पारू .. अजून आठवतेय..

एक उत्खननाची साईट. पार्वती, तरूणपणीची .. येतेय. बरोबर तिचे वडील. अप्पा टाकसाळे. दोघे येतात.

अप्पा : पत्ता तर बरोबर आहे. इथेतर खड्डे नि गढ्ढे दिसताहेत. कुणा माणसाचा वावर आहे असे दिसत नाही.

पार्वती : नाही तात्या, माझे मन सांगतेय. असणार ते इकडेच. माझ्या डाव्या डोळयाच्या पापणीचा उजवा भाग फडफडतोय.. म्हणजे ते इथेच असणार .. आजूबाजूस..

आज निघताना काळा कावळा पण कोकलत होता.. काव काव..

अप्पा : काळा? गोरा कावळा पाहिलास कधी? आणि मी सांगतो.. तुझी आई त्याला मॉर्डन ब्रेड खाऊ घालते रोज. तो आपल्याकडे पाव पाव म्हणून ओरडतो.. काव काव नाही. चल मुली परत जाऊ. ( नाटकीपणे ) तुझ्यासाठी कितीही उंबरठे झिजवावे लागले तरी बेहत्तर. पण तुझ्यासाठी राजकुमार शोधून आणणारच मी..

पार्वती : तात्या .. चुकीची असणार का हो ही जागा? इथे उंबरठाच दिसत नाही .. झिजवायला..

जवळच्या खड्ड्यातून आधी शिंगे बाहेर येतात.. पार्वती ते पाहून किंचाळते..

पार्वती : तात्या, त्या खड्ड्यातून कुणी प्राणी येतोय बाहेर ..

तात्या : शिंग आहेत म्हणजे त्याला अटॅच्ड प्राणी असणारच मुली. बिळात लपणारा हा कोण मोठा प्राणी ..

त्या शिंगांपाठोपाठ मोहन बारशिंगेचे हात नि मग डोके बाहेर पडते.. मग अख्खा मोहन..

तात्या : अरे, याला तर माणूस निघाला अटॅच्ड! शिंगे फुटलीत जणू.. नमस्कार ..

मोहन : (हातातल्या शिंगांनीच नमस्कार करत) नमस्कार ..

तात्या : तुम्ही आहात हो.. मला वाटले कुणी बारशिंग्या आहे की काय!

मोहन : हो बारशिंग्याच. पुरातन कालीन. इसवी सन पूर्व कालीन. याच्या शिंगातील रचनेचा अभ्यास करू तेव्हा कळेल याचे वय..

तात्या : ह्या सांबारशिंगाचा अभ्यास?

पार्वती : अय्या, तुम्ही असा अभ्यास करता?

मोहन : अर्थात. पुरातत्त्व शास्त्राचा अभ्यासक आहे मी..

पार्वती : अय्या कित्ती छान!

मोहन : मी याच विषयात डॉक्टरेट करतोय..

पार्वती : अय्या, शिंगांचा डॉक्टर ..

मोहन शिंगे घेऊन पुढे येतो.. ती पार्वतीला टोचणार.. तोच ती मागे सरकते

पार्वती : आजकाल सायन्स किती पुढे गेलेय नाही .. मी मागे सरकतेय पण.. कित्ती कित्ती हुशार तुम्ही ..

मोहन : कसचं कसचं..

पार्वती : तात्या ..

तात्या : काय बाळ?

पार्वती : मला हाच नवरा पाहिजे ..

तात्या : म्हणजे हा शिंगे कर का गोजिरवाणा.. आवडला आमुच्या राणीला?

मोहन : म्हणजे? मी पसंत आहे तुम्हाला? या शिंगांसकट?

तात्या : नावच बारशिंगे.. शिंगे असणारच! आणि आमच्या पोरीला शिंगे फुटलीच आहेत आता..

पार्वती : तात्या .. बॅकेतला काय.. ऑफिसातला काय.. सगळ्यांचे नवरे असलेच असतात .. माझा नवरा मला असलाच पाहिजे .. खड्डयातला.. पुरातन .. एकमेव.. ह्योच नवरा पाह्यजे .. पार्वतीचा शंकर..

मोहन : शंकर? नाही. मी तर मोहन.

पार्वती : पण मी तर आहे ना उमा.. गिरीजा ..

मोहन : गिरिजा? म्हणजे पर्वतावरची? पण मी तर ह्या खड्ड्यांत रमणारा माणूस ..

पार्वती : असू देत.. मी उमा.. ललिता .. पार्वती .. खड्ड्यात रंगले मी.. मला मोह पडलाय तो ह्या मोहनचा तात्या ..

तात्या : ठीक पोरी. तुझ्या इच्छेविरूद्ध नाही. जरूर जा .. तू खड्ड्यात जा.. बारशिंगे.. शिंगे मोडून वासरात नका शिरू.. घ्या शिंगावर.. फुंका रण शिंग! आता माघार नाही..

मोहन : जशी आज्ञा श्वशुरश्री..

तात्या : हा शब्द मी प्रथमच ऐकतोय ..

पार्वती : असं हो काय तात्या .. तुम्ही पहिल्यांदाच तर होताहात ना श्वशुर..

तात्या : हे बाकी खरंच.. श्वशुरश्री.. छान शब्द.. जामातश्री..

पार्वती : अय्या जामातश्री? म्हणजे मी लाजू? लाजतेच..

मोहन : मी पण लाजलो असतो.. पण पुरातन कालीन लाज आणि लज्जा या शोधनिबंधात लिहिलेय मी.. अश्मयुगातील लज्जा आणि लाजणे यांचे पुरावे कुठल्याही उत्खननात

सापडले नसून लाजणे ह्या क्रियेचा तद्नंतर उद्भव इसवी सनाच्या..

पार्वती : असू देत.. (लाजत) चला, मोहन चला .. लाजलाजूनी सात जन्म आपण ह्याच खड्ड्यात जाऊ चला..

प्रकाश परत प्रोफेसर आणि कवटीवर

प्रोफेसर : बघितलंस कवट्या. हिला तेव्हा याच खड्ड्यांची नि त्याच्यातल्या माझी भुरळ पडलेली.

आणि आता? अगं उत्खननाच्या सायटींवर आम्ही प्रेमगीते गायली..

परत खड्ड्यांच्या सेटवर

तीच साईट. तोच खणलेला खड्डा..

**पार्वती :**

**पाहिले तुलाच मी येता शिंगांवरती**

**मोहन :**

पाहिले तुलाच अन प्रेमा येई भरती..

पार्वती :

असेच राहू जन्मोजन्मी

हुडकत हुडकत खड्डे

मोहन :

सखे सांगतो तुज एक दिवस

नाव होईल बड्डे

पार्वती :

घे सख्या उचलूनी मजला

ह्या शिंगांवरती

मोहन :

पाहिले तुलाच अन प्रेमा येई भरती..

मोहन :

प्राणप्रिये सखये सजणे

क्षण एक न तुजविण जाई

**पार्वती :**

**भाळले या पुरातनी**

**मी हुरळून गेले बाई**

**मोहन :**

**बसव सखे तू मला**

**तव नयनांच्या वरती**

**पार्वती :**

**पाहिले तुलाच अन प्रेमा येई भरती..**

परत प्रकाश प्रोफेसर आणि त्यांच्या हातातील कवटीवर

प्रोफेसर : ऐकलेस कवट्या आमचे प्रेमाचे गाणे.. म्हणूनच म्हणतात .. प्रेमदिवाणे? आणि हिला हवाय आता सोबतीला.. कोण? कोण?? मी नव्हे तर .. जॅक्सन! जॅक्सन!! जॅक्सन!!

अंधार पसरतो. कवटी बाजूला आहे. तिच्यातले डोळे चमकतात. त्या प्रकाशात पाठून धूर दिसायला लागतो. हलक्या

पावलांनी एक माणूस पाठून येताना दिसतो. माणूस विचित्र आहे दिसायला. पण प्रोफेसरांच्या स्टडीरूममधल्या पुराणकालीन माणसाच्या फोटोसारखा दिसतोय ..

प्रोफेसर : (त्याला निरखून पाहात) वा! तू तर थेट मोहंजोदडोतून आलेला दिसतोयस..

माणूस : वॅक वॅक .. टॅक टॅक .. ड्यूक डॅक.. प्यूंक पॅा.. क्वॅक पॅक .. जॅक्सन..

प्रोफेसर : वा! प्रत्यक्ष तुझ्या तोंडून मोहंजोदडी भाषा ऐकायला मिळतेय!

जॅक्सन : हॅव.. ग्याव.. पँव पॅव.. प्यूंक पॅा

प्रोफसर : अरे वा! चांगला अस्खलित बोलतोयस..

(समोर बघून) तुम्हाला सांगतो ही मोहंजोदडी भाषा म्हणजे तेव्हाची संस्कृत.. लवकरच त्या भाषेतल्या प्रेमगाण्यांची सीडी काढणार आहे मी. पण प्रत्यक्ष जॅक्सनच्या तोंडून भाषा aऐकणे म्हणजे डायरेक्ट संजयच्या तोंडून युद्धाची रनिंग कॉमेंट्री ऐकणे आहे.. मला वाटते रेकॉर्ड करून ठेवावे... मोबाईल घेऊन येतो.. थांब जॅक्सन .. जॅक्सन थांब.. मेजर ब्रेक थ्रू इन आर्कियालॉजी..

मोहंजोदडी भाषा.. थांब जॅक्सना रेकॉर्ड करतो .. वेट जॅक्सन. वॅक वॅक जॅक .. सन!

प्रोफेसर आत जातात. आत जाऊन बाहेर येईतोवर परत धूर येतो.. त्यातून मायकल जॅक्सन बाहेर पडतो.. मून वॉक करत. पहिल्या जॅक्सनशी शेकहँड करतो. प्रोफेसर बाहेर येतात तेव्हा दोघेही नाचत असतात. पार्श्व संगीतावर.

प्रोफेसर : अलभ्य संधी .. मायकेल विथ मोहंजोदडो जॅक्सन .. व्हिडिओच बनवतो.. व्हॉट अ ब्रेक थ्रू.. ( मोबाईलकडे पाहात ) मेलाय? डेड? वेट.. जॅकसन्स.. कंटिन्यू डान्सिंग.. आलोच.. जॅक्सन्स..

प्रोफेसर आत जातात. तितक्यात ब्हो ब्हो आवाज करत एक कुत्रा अवतरतो.. दोघा जॅक्सन्स कडे पाहात ब्हो ब्हो भुंकतो.. दोघे जॅक्सन्स घाबरतात. प्रोफेसर बाहेर येतात..

प्रोफेसर : जॅक्सन ..

नवीन आलेला कुत्रा लाडाने जवळ येतो. दोघे जॅक्सन्स बघत राहतात.

प्रोफेसर : ओह गॉड! शेवटी हा जॅक्सन घरी आणलाच हिने.. जा जॅक्सना जा.. तुम्ही तिघे एकत्र नाचा पाहू..

कुत्रा जॅक्सन नि बाकी दोघे जॅक्सन पाठी नाचत राहतात.

प्रोफेसर (स्वगत): पाहिलीत या पुरातत्त्व तज्ञाची कमाल .. मी आहे पुरातत्त्व शास्त्रज्ञ.. मी आहे मानव वंश शास्त्रज्ञ, मी आहे इतिहासकार.. उत्खननातल्या बारशिंग्याच्या शिंगांची शपथ..(एकेकाकडे बोट दाखवत) हा जॅक्सन.. तो जॅक्सन आणि तो सुद्धा.. जॅक्सनच! म्हणजे मोहंजोदडोतला जॅक्सन पुनर्जन्म होऊन आला मायकेल बनून? आणि मायकेल ..? माय गॉड.. ब्हो ब्हो? ब्हो ब्हो जॅक्सन? असणार! असेच असणार! एक जॅक्सनची अनेक रूपे! म्हणजे यांचे जन्मदाते जॅक्सन .. ही जॅक्सनची मुले.. ऑल आर जॅक सन्स! जॅक ऑफ ऑल जॅक्सन्स.. यस्स. प्रोफेसर बारशिंगे हॅज क्रॅक्ड इट! जॅक्सन अँड जॅक्सन थ्रू जनरेशन्स..

डायरेक्ट डिसेंडंट्स! डायरेक्ट डिसेंडंट्स? नो? पुनरूज्जीवित! रिइन्कारनेशन! ब्हो ब्हो त्या मोहंजोदडियन जॅक्सनचा अवतार! ग्रेट ब्रेक थ्रू! कवट्या.. ऐकतोयस ना? कसा ऐकशील? तुझ्या कानाच्च्या आतली हाडे थोडीच आहेत शाबूत? बट आय हॅव डन इट! प्रोफेसर डॉक्टर मोहन प्रभाकर बारशिंगे.. एम ए. पी एच डी.. हॅज डन इट!

प्रवेश २

प्रोफेसर बारशिंगे बसले आहेत. आपल्या रूम मध्ये. समोर टेबलावर सगळ्या जुन्या पुराण्या गोष्टी आहेत.

प्रोफेसर हातातील कवटीशी बोलत आहेत. बाजूला जॅक्सन म्हणजे पाळीव कुत्रा खेळतो आहे..

प्रोफेसर : तुला सांगतो कवट्या, सारे संशोधन एकीकडे आणि हा जॅक्सनचा शोध एकीकडे. ( समोरच्या मोहंजोदडोतील माणसाच्या फोटोकडे हात दाखवत) हा त्यादिवशी भेटला. प्रत्यक्ष! त्याची ती प्राचीन भाषा ऐकली. कान धन्य झाले. तू ही त्याच जमान्यातील. पण नुसतेच हाड. तो मांसदेखील.. म्हणजे हाडामासांचा होता.. खराखुरा! जॅक्सन!

*( कुत्रा जवळ येऊन ब्हो.. म्हणून भुंकत उभा राहतो )*

प्रोफेसर : तू नाही रे सोन्या .. तुझ्या पूर्वजाबद्दल बोलतोय.. इंग्रजीत फोरफादर्स म्हणतात त्याबद्दल! त्यातले दोन फादर्स तरी सापडले तुझे.. विचार कर जॅक्सन, एकच नाही कळले अजून त्या जॅक्सन नंतर मायकेल जॅक्सन डायरेक्ट? इतकी

हजारो वर्षे मध्ये गेली त्यात काही नाही घडले? अर्थात घडले असणार. अजून संशोधनाची गरज आहे राजा. कवटीभाऊ, अजून संशोधन.. संशोधन .. खड्डे खणून शोधून काढू.. जमिनीच्या खाली .. भूमीने पोटात दडवून ठेवलेली रहस्ये .. माझे पुण्य म्हणून मला हा जॅक्सन मिळाला .. ( कुत्रा अंगाशी येऊन खेळू लागतो..)

प्रोफेसर घोष आत शिरतात..

घोष : ओह देबा रे देबा .. आमि देखछिलाम.. अरे, बार्शींगे .. तुम अँड डॉग? आमि स्बोप्न देखिलाम?

आमि शोमजला तुमि कुतरा लाइक नही कोरता बार्शींगे.. अँड हिअर प्लेईंग विथ डॉग

प्रोफेसर : मि. घोष.. हा कुत्रा नाही ..

घोष : उई मा! कुत्री?

प्रोफेसर : नायदर! न कुत्रा न कुत्री .. धिस इज जॅक्सन ..

घोष : हूज सोन?

प्रोफेसर : घोष, ह्याचे नाव जॅक्सन. ही इज रिइनकार्नेशन ..

घोष : उडी बाबा.. ओबोतार? स्बामी कुत्रानंद डॉगदर बार्शींगे?
आमि नोमोश्कार करून..

घोष जॅक्सनला कमरेत वाकून नमस्कार करतात. जॅक्सन परत भुंकतो.. ब्हो ब्हो..

प्रोफेसर : अरे घोष.. तसा अवतार नाही रे बाबा .. मोहंजोदडोतल्या ओरिजिनल जॅक्सनचा या जन्मीचा अवतार आहे जॅक्सन ..

घोष : वॅगिंग डॉग बाय इट्स टेल? डोन्ट टेल मी द टेल ऑफ रिबर्थ .. अँड हू सेड दॅट?

प्रोफेसर : हू म्हणजे काय?

घोष : नो नो.. हू मीन्स हू ..

प्रोफेसर : तेच तर सांगतोय घोष.. हू म्हणजे काय..

घोष : उई बाबा, इंग्लिश जानि ना? हू म्हणजे काय सेईंग तू?

प्रोफेसर : घोष, डोन्ट प्ले हू तू तू..

घोष : नो बाबा.. नॉट प्लेईंग.. हू मीन्स..

प्रोफेसर : घोष.. उगाच हू हू चा घोष करू नकोस.. मी शोध लावलाय .. हा जॅक्सन म्हणजे तो जॅक्सन .. तो फोटोत दिसतोय तो. ओरिजिनल.

घोष : उई बाबा, सोंशोधन? कॅन यू प्रूव्ह?

प्रोफेसर : प्रूव्ह? यू डोन्ट नीड टू ॲप्रूव्ह! माझा आतला आवाज सांगतोय .. धिस जॅक्सन इज दॅट जॅक्सन .. हो की नाही रे जॅक्सन?

जॅक्सन : ब्हो ब्हो..

घोष : जॅक्सन एकटाच आवाज कोरता? भो भो?

प्रोफेसर : ओह घोष! लिसन केअरफुली. नॉट गावठी कुत्रा .. ही इज स्पेशल ब्रीड .. ही भुंक्स ब्हो ब्हो ..

घोष : सेम थिंग. भो भो कोरबे ..

प्रोफेसर : ब्हो ब्हो.. जॅक्सन भुंक अगेन प्लीज..

जॅक्सन : ब्हो ब्हो..

प्रोफेसर : लिसन घोष.. ब्हो ब्हो.. गेट द राईट डिक्शन

घोष : उई बाबा .. जॅक्सनेर ब्रादर? डिक्सन?

प्रोफेसर : सोड घोष.. जॅक्सन इज स्पेशल. माय सोंशोधन .. मी रेकॉर्ड केलाय तिघांचा डान्स .. वॉट टू सी?

घोष : नो नो प्रोफेसर बार्शींगे. आय हॅब कम ऑन अ स्पेशाल ड्यूटी .. मेसेज फ्राॅम प्रिन्शिपॉल .. ब्हेरी बिजि .. प्रिन्शिपॉल सार कॉल्ड यू.. ताडाताडि .. अँड सेंट धिस लेटार.. ( पत्र देतो )

प्रोफेसर : ताडाताडी? म्हणजे?

घोष : ताडाताडि जानि ना?

प्रोफेसर : जानी? आय नो जानी दुष्मन..

घोष : अरे, एकटा जानि.. कि बोलछी .. नो..

प्रोफेसर : नो? आय नो.. यू आर नॉट जानी दुष्मन..

घोष: उई बाबा, जानि मीन्स नो.. के एनोडब्ल्यू..

प्रोफेसर : ओह! नाऊ आय क्नो! पण ताडाताडि .. आय डोन्ट क्नो ..

घोष : ताडाताडि.. आरज्ंट..

प्रोफेसर : ओह!

घोष : ताडाताडि मीन्स आर्जंट प्रोफेसर बार्शींगे.. आमि जाच्छि.. ताडाताडि.. जॅक्सन बाय.. जास्ट साईन हिअर. (पेन देत प्रोफेसरांना.. प्रोफेसर पेनाकडे थोडावेळ पाहातात..)

प्रोफेसर : हुं.. अर्वाचीन पेन.. मला वाटलं समथिंग स्पेशल ..
अँटिक पेन.

समोरच्या कागदावर सही करतात

घोष : आमि जाच्छि.. बाय जॅक्सन ..

जॅक्सन शेपूट हलवतो.

प्रोफेसर : सी घोष. जॅक्सन इज सेइंग बाय..

घोष : बाय..

प्रोफेसर : आमी पण जाश्शी.. ताडाताडी.. जॅक्सन नको करू
पाडापाडी.. सिट डाऊन..!

घोष निघून जातात. आतून पार्वतीबाई येतात. जॅक्सन त्यांच्या अंगावर उड्या मारू लागतो. आधीचा कजागपणा जाऊन पार्वतीबाई जॅक्सनच्या येण्यामुळे अगदी शांत झालेल्या आहेत..

पार्वतीबाई : अरे हो हो जॅक्सन. व्हाय जंप? व्हाय उगाच जंप? खूप खूश झालास? मूव्ह युवर शेपूट.. मूव्ह.. अरे मूव्ह ना..

प्रोफेसर : अगं त्याला इंग्रजी कळत नसेल ..

पार्वतीबाई : तुमचं आपलं काहीतरीच. माझा शहाणा डॉगी तो.. त्याला सगळं कळतं. यस्स की नाही रे जॅक्सन?

प्रोफेसर : नाही, तुझं इंग्रजी नसेल कळत ..

पार्वतीबाई : काहीतरीच तुमचं. जॅक्सनला माझी भाषा कळते.. उंडर.. स्टँड की नाही रे जॅक्सन .. बघा.. शेपूट मुव्हली त्याने. जॅक्सन चला .. बाथरूममध्ये .. गुड डॉगी.. कोण आले होते हो?

प्रोफेसर : बाथरूममध्ये?

पार्वतीबाई : नाही हो.. मघाशी कोण आलेले.. पाल?

प्रोफेसर : पाल? ती कशी अशी गप्पा मारायला येईल?

पार्वतीबाई : ती पाल नाही .. काहीतरीच तुमचे. तुमचे ते प्रोफेसर पाल..

प्रोफेसर : ही कोण नवीन पाल? प्रोफेसर? माझ्या मनात चुकचुकतंय काहीतरी .. म्हणजे तुझं चुकतंय. पाल नाही

तर घोष. प्रिन्सिपॉलनी बोलावलेय भेटायला. जाऊन येईन.. ताडाताडी..

पार्वतीबाई : म्हणजे?

प्रोफेसर : म्हणजे जॅक्सनचे पंजे! आरजंट.. लगेच..

पार्वतीबाई : आता? आणि जॅक्सनची अंघोळ? पहा किती घाम आलाय त्याला .. घामोळ्या होतील..

प्रोफेसर : कुत्र्याला घामोळ्या.. नो.. ही इजन्ट अ डॉग! पण आल्यावर घालू.. हो की नाही जॅक्सन?

पार्वतीबाई : ते काही नाही. आधी अंघोळ जॅक्सनची..

प्रोफेसर : वा! आधी लग्न कोंडाण्याचे .. मग प्रिन्सिपॉलचे?

पार्वतीबाई : होच मुळी.. प्रिन्सिपॉल अंघोळ करून येत नाही ..? जॅक्सन इज गुड बॉय.. हो की नाही जॅक्सन? दे क्लॅप दे क्लॅप..

जॅक्सन एक पुढचा पाय त्यांच्या हातात देतो..

पार्वतीबाई : चला.. चाली चाली करूया.. जॅक्सन उभा राहिला. आम्ही नाही पाहिला.. लवकर या याला अंघोळ घालायचीय..

प्रोफेसर : येतो. मोहंजोदडोकालीन न्हाणीघर.. बाथरूम .. माझा नवीन शोधनिबंध.. त्या बाथरूममध्ये त्या जॅक्सनने केली असणार अंघोळ .. आता ह्या बाथरूममध्ये ह्या जॅक्सनची..

पार्वतीबाई : न्हाऊ न्हाऊ.. चला..

सूत्रधाराचा आवाज पाठीमागून.

जॅक्सनला खसाखसा अंघोळ घातली प्रोफेसरांनी. आपल्या पूर्वजांच्या श्राद्धाच्या दिवशी ज्या श्रद्धेने लोक जेवू घालतात इतरांना.. जणू पितरच जेवताहेत समजून.. त्याच श्रद्धेने. तो मोहंजोदडी जॅक्सन ..पूर्व जन्मीचा .. या अंघोळीने ताजातवाना होत असेल? शंकाच नको. अगदी प्रोफेसरांच्या रूम मधल्या फोटोतही तो दिसायला लागतो शूचिर्भूत! प्रोफेसर त्याला समाधानाने पाहून निघतात. प्रिन्सिपॉल साहेबांना भेटायला. तानाजी मालुसरेसारखे शब्द खरे करत.. आधी लग्न जॅक्सनचे मग प्रिन्सिपॉलसरांचे! निघता निघता स्वतःशी बोलताना प्रोफेसर गोंधळतात.. सरांचे लग्न? या वयात? पुरातन काळी हे असे नसायचे बहुधा .. संशोधन केले पाहिजे ..

प्रोफेसर मागे फिरतात..

प्रोफेसर : पार्वती, अगं पार्वती .. ऐकलंस का?

पार्वतीबाई आतून लगबगीने बाहेर येतात.

पार्वतीबाई : काय हो? काय झाले?

प्रोफेसर : कमीतकमी पाकिट तर दिले असतेस हातात ..

पार्वतीबाई : पाकिट? ते कशासाठी?

प्रोफेसर : अगं वा! रिकाम्या हाताने जाऊ? लग्नाला जाताना हातात काही नको द्यायला?

पार्वतीबाई : कोणाच्या लग्नाला चाललायत? तुम्ही कॉलेजात निघालात ना?

प्रोफेसर : कॉलेजात? येस्स. प्रिन्सिपॉल सरांचे लग्न कॉलेजात आहे!

पार्वतीबाई : डोके फिरले तुमचे? जा साहेबांनी बोलावून अर्धा तास झाला. साहेब पिसाळला तर काही खरे नाही ..

प्रोफेसर : पिसाळायला ते काय कुत्रा आहेत?

पार्वतीबाई : कुत्रा आणि पिसाळणार? आजकाल माणसंच पिसाळतात..

प्रोफेसर : असतील ही. आजकालचे मला नाही ठाऊक. पुरातन काली माणसं पिसाळत नसत.. पण लग्न कॉलेजात? आधी लग्न जॅक्सनचे.. मग सरांचे..

पार्वतीबाई : काय बोलताय तुम्ही?

प्रोफेसर : अगं हो.. हॅत्तिच्या! माझ्या आता लक्षात आलेय. जॅक्सन जस्ट टुक बाथ.. गंगेत कुत्रं न्हालं! जॅक्सन डिडन्ट गेट मॅरिड! देन हाऊ कॅन प्रिन्सिपॉल सर? सिंपल लॉजिक! मी निघतो! ताडाताडी!

प्रोफेसर निघून जातात ..

पार्वतीबाई :(जॅक्सनला कुरवाळत) एकूण कठीण आहे सगळे. (विठ्ठला.. च्या चालीवर) जॅक्सना.. तूच एक आधार..

प्रवेश ३

स्थान : प्रोफेसरांचे घर.

प्रोफेसर आणि घोष येतात. पार्वतीबाई समोरच आहेत..

पार्वतीबाई : आलात? झाले ना काम?

प्रोफेसर : अगं हो? पण जॅक्सन कुठेय?

पार्वतीबाई : अहो अंघोळ झाली आता झोपलाय गुलाम. चांगला तीन तास झोपतो अंघोळीनंतर.

घोष : उई बाबा .. डॉग इज स्लीपिंग..

प्रोफेसर : बघ घोष. घर अगदी सुने सुने.. घोष.. तू ते कागद कुठे ठेवलेलेस?

घोष : कागोद? आमि जानिना .. मस्ट बी ऑन द टेबॉल ..

प्रोफेसर : बघ. आहेत का.. ये आत ये..

पार्वतीबाई : कसले हो पेपर?

प्रोफेसर : अगं ते पिवळे पेपर ऑफिसचे. विसरून गेला घोष.. मगाशी.

घोष आत जाऊन टेबलाशी शोधताहेत.. पार्वतीबाई आणि प्रोफेसर बाहेरच उभे आहेत..

पार्वतीबाई (हळूच) : अहो ते? जॅक्सनला साफ करायला वापरले नाहीत का.. तुम्ही ..

प्रोफेसर : बाप रे! मेलो! अगं ते प्रिन्सिपॉल साहेबांचे पेपर्स होते..

पार्वतीबाई (जोरात..) : काय?

प्रोफेसर : हळू..

पार्वतीबाई (हळूच) : काय?

प्रोफेसर : पण काही हरकत नाही. जॅक्सनची सेवा ही पुरातत्त्व खात्याची सेवा. प्रत्यक्ष प्राचीन मोहंजोदडी जॅक्सनचा अवतार.. त्यापुढे हे अर्वाचीन प्रिन्सिपॉल .. हुं..

घोष (आतून) : कोथाय .. प्रोफेसर बार्शींगे .. आमि देखते पारी ना.. व्हेआर इज इट..?

प्रोफेसर : घोष.. यू डिडन्ट ब्रिंग देम? की दुसरीकडे विसरला .. आय थिंक ऑन प्रिन्सिपॉल सरांचे टेबॉल वर.. विसरला तू..

घोष (बाहेर येत) : यू मीन आय गॉट ऑर फा ॅरगॉट?

प्रोफेसर : राईट.. अरे वरी नॉट. प्रिन्सिपॉल सलामत तर पेपर पचास ..

घोष : पोचास ना.. एकटा पेपर. यल्लो.. उई मा.. आमादेर टेन्शन ..

प्रोफेसर : टेन्शन कसले घोष.. पेपर तर होते ना..

घोष : ना.. प्रिन्शिपॉलसार आमाके मेमो देच्छि .. मारा गेलो.. मारा गेलो ..

घोष जातात.

प्रोफेसर : मारा गेलो कसला.. जिवंत गेलो.. जिवंत गेला की..

पार्वतीबाई : तुम्हीपण.. कुठलाही पेपर वापरता.. बिचाऱ्या घोषला आता साहेब ओरडणार..

प्रोफेसर : घोष? घोषचा जयघोष कशाला? तो तर मारा गेलो .. मेलेली कोंबडी आगीला आणि मेलेला घोष साहेबाला.. भीत नाही!

पार्वतीबाई : काहीपण बोलता तुम्ही ..

प्रोफेसर : ते राहू देत. चल.. मला तयारीला लागावे लागेल ..

पार्वतीबाई : तयारी? कशाची? प्रिन्सिपॉल साहेबानी काय नवीन ब्याद लावून दिली मागे? की नव्याच ठिकाणी खोदून खड्ड्यात जायचेय?

प्रोफेसर : खड्डा? तुला सांगू .. अहाहा .. काय ते उत्खनन .. काय त्यातून बाहेर पडणाऱ्या एकेक वस्तू.. नुसता विचार केला तरी अंगावर काटा येतो. हाडे काय.. झाडे काय.. जीव आणि जीवाश्म काय.. दगड आणि धोंडे.. अगं मागे कवट्या सापडल्या.. कवट्या.. वा!

पार्वतीबाई : वा? जादूटोणा शिकताय की मंत्रतंत्र ..

प्रोफेसर : तुला नाही कळणार.. व्हॉट नाइस फिलिंग.. हाडं नि कवट्या! जमिनीखाली असाच गाडला गेला असणार तो जॅक्सन .. पुनर्जन्म होऊन आता नेमका आला आहे आपल्या घरी.. नक्कीच काहीतरी संकेत आहे..

पार्वतीबाई : आहेच माझ्या जॅक्सनचा पायगुण चांगला .. तसा खुर्चीचा पाय पाहून तो ही वर करतो पाय..

प्रोफेसर : अगं लहान आहे अजून .. बरं.. मला संध्याकाळी निघावे लागेल .. त्या एक्स्कॅव्हेशन साइट जवळच आहे..

पार्वतीबाई : म्हणजे परत खाणीत जायचे?

प्रोफेसर : म्हणजे? मी काय खाण कामगार वाटतो तुला? खनिकर्म विभाग?

पार्वतीबाई : म्हणजे काय फरक आहे दोघांत?

प्रोफेसर : आठवतेय.. ( स्वत: कडे बोट दाखवत..) हे रत्न तुला अशाच खाणीत मिळालेले..

पार्वतीबाई : हुं.. जॅक्सन आहे म्हणून बरे.. नाहीतर नशीब फुटके म्हणाले असते मी.. खाणीत हिरा मिळतो तसा कोळसाही .. तेव्हा नव्हते ना ठाऊक!

प्रोफेसर : अगं कोळशाचाच बनतो हिरा .. ठाऊक आहे ना? ते राहू देत..

पार्वतीबाई : राहूच देते. कोळसा नाहीतरी उगाळावा तेवढा काळाच..

प्रोफेसर : बरं बरं.. तयारीला लाग.. जावे लागेल मला ..

पार्वतीबाई : खुश्शाल जा. बघा, जॅक्सन आहे तर तुम्ही गेल्यानंतर मला काही फरक नाही पडणार.

(आतून जॅक्सनचा भुंकण्याचा आवाज येतो, लहान मूल झोपेत उठून रडते तसा)

पार्वतीबाई : अगं बाई झोप मोडली वाटते सोन्याची .. मी आलेच हां.. आले रे सोनुल्या..

पार्वतीबाई आत निघून जातात. प्रोफेसर आपल्या स्टडीरूम मध्ये.. कवटी हाती घेऊन बोलू लागतात.

प्रोफेसर : कवट्या! जॅक्सन आहे घरी.. त्याला सोडून जायचे जिवावर आलंय. पण ड्यूटी इज ड्यूटी. जावं लागेलच.. बघतो तिकडे नवीन काही सापडेल अजून. सरांचे काय.. काहीतरी काम सांगतात. अरे कासलगडच्या कॉलेजचे ॲफिलिएशन काय माझे काम आहे? पण नाही .. दिसले प्रोफेसर बारशिंगे .. द्या त्यांना पाठवून. दोन दिवस कॉलेजचे इन्सपेक्शन.. जाण्यायेण्यात दोन दिवस. तितके काम मागे पडते. ती परवा हाडं आणलीत त्यांचे वय तपासून पहायचे आहे. ते मागच्या वेळेसारखे नको व्हायला. वाटतात तर पुरातन गोष्टी पण निघायच्या कुठल्यातरी दहा वर्षापूर्वीच्या. मग सारेच मुसळ केरात.. तयारीस लागावे ते बरे.. जॅक्सन ..

पाठून धूर.. त्यातून मोहंजोदडोतला जॅक्सन आणि पाठोपाठ मायकेल जॅक्सन बाहेर येतात .. दोघेही कमरेतून वाकत

ॲट युवर सर्व्हिस सर..

प्रोफेसर : माझी कसली सरव्हिस? तुम्ही आहात म्हणून मी आहे..

मायकल : (गातो किंचाळत)

नो नो नो सर..

व्हाय व्हाय व्हाय सर..

प्रोफेसर : अरे, पुरातन गोष्टी म्हणजे माझा प्राण की जीव.. मी गेलो की म्हणा.. कसा अँटिक मनुष्य .. कावळ्या पिंडाला शीव.. तेव्हा मी तुमचा ऋणी आहे..

दोघेही ऋणी शब्दाने गोंधळतात..

मायकल : (तसाच किंचाळत)

रूणी?

व्हॉट व्हॉट व्हॉट सर..

नॉट नॉट ऑन द डॉट सर..

मोहंजोदडी : वॅक वॅक.. उंगाडू.. ट्वॅक ट्वँको.. उल्लूल्लू..
पॅजपॅज..

प्रोफेसर : आता कळले मायकल? बघ हा जॅक्सन कसा हुशार
आहे.. हँद हँद .. टॅली टॅली..

मोहंजोदडी जॅक्सन टाळी देतो .. मायकल नाचत नाचत टाळी घेतो..

मोहंजोदडी : ढँढ्यँ वँगड्युंकँड.. बिचीबँग.. बिचीबँग.

मायकल : ओह सर.. वुई आर्र.. बॅक विथे बँग .. बँग बँग..

प्रोफेसर दोघांकडे डोळे भरून पाहात बसतात.. आतून भुंकत जॅक्सन बाहेर येतो. प्रोफेसरांच्या मांडीवर चढून बसतो. जीभ बाहेर काढून बाकी दोन्ही जॅक्सनकडे बघत बसतो..

प्रोफेसर : झोप झाली वाटतेय.. बघ तुझे फोर फादर्स.. जॅक्सन .. आहेत ना मस्त..

जॅक्सन ब्हो ब्हो करत जोरात भुंकतो.. एकाएकी बाकीचे दोन्ही जॅक्सन नाहीसे होतात..

प्रोफेसर : अरे, जॅक्सन, दोघे कुठे गेले आता? व्हाय डीड यू भूंक.. सॉरी बार्क .. तुझे चारपैकी दोन फादर्स ना ते .. फादर्सवर कुणी भुंकतं का? यू हॅव बीकम बेशिस्त हां..

जॅक्सन खाली उतरून खुर्चीच्या पायाजवळ पाय वर करू लागतो..

प्रोफेसर (ओरडत) : जॅक्सन..

जॅक्सन एकाएकी दचकतो.. वर गेलेला त्याचा पाय तसाच राहतो .. लंगडत चालू लागतो..

प्रोफेसर : पार्वती .. ह्याला घे.. चांगले वळण आताच लावायला हवे..

जॅक्सन परत भुंकतो.. भुंकत राहतो..

सूत्रधाराचा आवाज :

आता पुरातत्त्व तज्ञ प्रोफेसर बारशिंगे निघतील नव्या मोहिमेवर. त्या कॉलेजच्या इन्स्पेक्शन साठी. त्याजवळच आहे त्यांची उत्खननाची साइट जिथे त्यांना ती बाराशिंगे सापडलेली आणि पार्वती आणि ते दोघेही भेटले होते येथेच! जुन्या दिवसांची आठवण येईल त्यांना? शिंगांची येईलही.. येईलही नव्हे .. येईलच! पुरातत्त्व त्यांचा श्वास आहे.. हे तत्वच आहे म्हणा त्यांचे.. जेवढी गोष्ट पुरातन तेवढे त्यांना तिचे आकर्षण..

प्रवेश ४

स्थळ : प्रोफेसर बारशिंगेंचे घर.. पार्वतीबाई कडेवर जॅक्सनला घेऊन लहान मुलाला झोपवावे तसे झोपवताहेत. अगदी अंगाई सकट..

जो जो रे.. जो जो रे

जॅक्सन नंदना रे जॅक्सन

जो जो रे..

कुलभूषणा

जॅक्सन नंदना रे श्वाना

जो जो रे..

इतक्यात फोन वाजतो. पार्वतीबाई त्याच्याकडे रागाने पाहतात. जॅक्सन सुळकन हातातून निसटून खेळायला लागतो. पार्वतीबाई फोन घेतात.. पलिकडून त्यांची मैत्रीण बोलतेय..

पार्वतीबाई : हॅलो.. कोण? शकुंतला?

.. बाई बाई बाई..

.. किती वर्षांनी आठवण आली गं ..

.. काय?

.. मला? मला येते ना..

.. आता तुझी आठवण झाल्याशिवाय एक ही दिवस जात नाही असे पेपरात छापतात तसे म्हटले तर चालेल तुला?

.. पुण्यात आहेस? वाटलंच मला?

.. कशावरून काय? हुशार आहेस ना.. म्हणून ..

.. बरी आहे..

.. हो ना! काय? मिलिट्रीत? भारी रूबाबदार असतात नाही?

.. छे गं.. होते आधी तसे .. पण बदलले लग्नानंतर ..

.. हाडं गोळा करतात .. नाही गं..

.. अगं काहीतरी जुन्या पुराण्या गोष्टी ..

.. काहीतरीच.. भंगाराचा धंदा वाटतो तुला?

.. पुण्यातली आहेस.. कळतंय ..

.. प्रोफेसर आहेत.. डॉक्टर प्रोफेसर बारशिंगे ..

.. शिंगे गं.. रणशिंगे असतात ना तसे.. बारशिंगे ..

.. नाही गं.. बारटक्के असतात ना.. तसे..

.. सोनटक्के नाही.. बार.. बार.. बारशिंगे ..

.. बाशिंगे नाही ते गुडघ्यास बांधतात ते वेगळे .. हे  बा.. र.. शिं..गे..

.. हं.. हो ना.. (जॅक्सन कडे पाहात) .. जॅकी नको .. मस्ती नाही करू..

.. हुं. आमचा जॅकी गं. खोडकर आहे नुसता..

.. छे गं.. वर्षाचा पण नाही. पण खट्याळ आहे..

.. नाही गं.. जॅकी म्हणजे जयकिशन नाही .. जॅक्सन ..

.. ख्रिश्चन नाव वाटते म्हणतेस? छे गं.. त्याला कसला आलाय धर्म?

.. नुसता दिवसभर हैराण करतो सांगू इतका ..

.. या वयात काय? अगं आमचा मोठा तिकडे न्यूझीलंडला आहे ना.. करमत नाही ..

.. काहीतरीच काय वयाचे घेऊन बसलीयस .. (जॅक्सन कडे पाहात) जॅकी.. नीट उभा रहा.. पुढच्या पायांवर .. जॅकी.. हो रे.. सॉरी .. हा म्हणजे असा आहे ना..

.. हो गं.. म्हणजे काय.. पुढे पाय नसतात? (जॅक्सन कडे पाहात, तो समोरचे हाड खाण्याचा प्रयत्न करतोय) जॅक्सन .. नीट चावून खा.. श्नोटात अडकेल ..

.. काय म्हणजे काय? सगळं खातो जॅकी. नखरे नाहीत अजिबात. अगं एकदम नरम हाडूक .. जॅकीला आवडते भारी..

.. हाडूक गं.. मुद्दाम नरम पाहून आणते मी..

.. काहीतरीच तुझं..

.. ते दिसलं की शेपूट हलवतो बघ कसा.. स्लेव्ह.. गुलाम ..

.. अय्या म्हणजे काय? विचित्रच आहेस तू? आमचा पाळीव कुत्राच आहे? तुला काय वाटले? या वयात मूल?

.. शाळेत असताना पण अशीच होतीस तू.. पण अजून बदलली नाहीस हां तू..

.. छे ग! मिस्टर मागे लागले खूप ..

.. चावट आहेस.. माझ्या नाही .. म्हणून पाळलाय..

.. अगं खूश ते खूप जॅक्सन वर.

.. कुत्रा काय  म्हणतेस गं त्याला .. जॅक्सन आहे तो..

.. अगं यांना वाटते ना पूर्व जन्मी तो कोणता तो होता ना .. मोहनजोधडी कोणी त्याचा अवतार आहे जॅक्सन.

.. जोशी नाही गं.. जोधडी की काहीतरी, मोहन जोधडी.. कायतरी नाव असते ना?

.. अगं मी नाही म्हणत होते.. पण मिस्टर मागे लागले अगदी. जॅक्सन  लाडका आहे त्यांचा.

.. हो ना! फोन कशासाठी? असेच ना?

.. हो का? वा! कधी येतेयस?

.. चालेल ना. कित्येक वर्षांनी भेटू आपण.. मी नाही जात कुठे गं. आता हा जॅक्सन आहे म्हणजे.. वेळच मिळत नाही गं..

(जॅक्सन खुर्चीच्या पायाशी तंगडी वर करतो)

.. जॅकी.. हियर नॉट.. हिअर नॉट रे.. इथे नाही .. बाथरूम गो टू ..
चल गं ठेवते हां .. शकुंतला.. खूप दिवसांनी गप्पा मारल्या ..
आलीस की बोलूयात।

.. हो ना! जॅकीपण भेटेल तुला.

.. बघशील किती गोड भुंकतो..

.. चल गं ठेवते.. जॅकीने काहीतरी केलाय इकडे कारभार ..

.. बाय..

पार्वतीबाई जॅक्सनला उचलून 'बाई बाई हा जॅक्सन ना..' म्हणत आत जातात.

सूत्रधाराचा आवाज :

जॅकीचा कारभार म्हणजे काय! बाई त्याला घेऊन तरातरा बाथरूममध्ये गेल्या खऱ्या भराभरा, पण सगळे होऊन गेलेले .. बैल

गेल्यावर झोपा करून काय उपयोग? पण श्वानवर्गीय मंडळी याबाबतीत नाठाळ. दिसला खुर्चीचा पाय.. केली वर तंगडी आणि काय! साहजिकच आहे. अगदी प्रोफेसरांना वाटते तशा मोहंजोदडोकालीन जॅक्सनच्या या कालातील अवतारातही .. हे श्वानवर्गीय गुण असणार की नाही? तर प्रोफेसर बारशिंगे तिकडे गेलेत.. चुकला फकीर मशिदीत जातो तसे कॉलेज इन्स्पेक्शन संपवून त्या उत्खननाच्या साइटवर पोहोचलेच.. कॉलेज इन्स्पेक्शनहून हे इन्स्पेक्शन जास्त महत्त्वाचे .. नाही का? जेथून ती पुरातन कालीन बाराशिंगे सापडली त्या जागेच्या दर्शनाने प्रोफेसर भावुक झाले.. आणि लगेच त्यांना तेथेच झालेले पार्वतीचे प्रथम दर्शन आठवले .. नि ते लगेच सावरले .. पाहणी दौरा आटोपून प्रोफेसर परतणार आता.. त्यांना तिथेच दिव्य ज्ञानाची प्राप्ती झाली. कुणाला पिंपळाच्या किंवा बोधीवृक्षाखाली होते.. कुणाला अजून कुठे. प्रोफेसरांना ज्ञान प्राप्ती झाली ती त्या उत्खननाच्या जागी.. प्रोफेसर तिथेच बसलेले भावुक होऊन.. त्या बारशिंग्यानी करियर घडवली त्यांची. समाधी लागावी तसे बसलेले प्रोफेसर .. आधी बारशिंग्या.. मग पार्वती .. आता नवीन ज्ञानप्राप्ती.. इजा बिजा अन तिजा! माणसाचे दैव असे घडवून आणते! त्या ज्ञानप्राप्तीच्या उज्जवल उजेडाने उजळून निघालेले बारशिंगे घराकडे निघाले .. त्यांच्या अंतर्मनात आता दिव्य प्रकाशाचा उगम झालाय.

.. लोक भविष्यामागे लागतात .. प्रोफेसर भूतकाळामागे.

आणि आता त्यांना सारे भूतकाळातले स्पष्ट दिसू लागलेय! होय!

.. स्पष्ट आणि सुस्पष्ट!

# अंक दुसरा

प्रवेश १

प्रोफेसर घरात शिरतात. आतल्या खोलीत जाऊन आपली बॅग उघडून त्यातून कवटी काढून ठेवतात. मग बाकी बॅग घेऊन बाहेर येतात .. ती बॅग ठेऊन परत आत जातात. एकदा मोहंजोदडोतल्या माणसाचा फोटो डोळे भरून पाहतात. कवटीला कुरवाळून बाजूला ठेवतात. खुर्चीवर बसतात. कवटी हाती घेऊन स्वप्न पाहिल्यासारखा चेहरा करतात. एकाएकी आठवण येऊन जॅक्सनला हाक मारतात.

जॅक्सन ..

मायकल उभा राहतो समोर..

मायकल : (किंचाळून गातो.. किंवा गाताना किंचाळतो)

यस्सर .. यस्सर ..

यू कॉल्ड मी सर..

आय वॉज वॉकिंन ऑन्द मूं

लेफ्ट दॅन अँन केम राईटवे सर..

पाठोपाठ मोहंजोदडी जॅक्सन येऊन उभा राहतो ..
त्याच सुरात गातो..

हँको पँको डॅखो डार डर डार डर
गँगो गँगो मुंगी सुंगी टँगो टार टर..

आतून जॅक्सन धावत येतो.. प्रोफेसरांच्या अंगावर चढून ब्हो ब्हो ब्हो ब्हो भुंकायला लागतो. बाकी जॅक्सन एकाएकी दिसेनासे होतात ..

प्रोफेसर :

ओह! जॅक्सन! आय मिस्ड यू.. जॅक्सन आय मिस्ड यू.. तुला ठाऊक आहे.. मला ठाऊक आहे आता भूतकाळ. मोठमोठे ज्योतिषी होऊन गेले जे सांगतात भविष्य. मी सांगतो तो भूतकाळ.. काळ जो भुतासारखा आहे.. नाही. देअर इज नो ॲक्च्युअल भूत एनी व्हेअर! जो आहे तो भूतकाळ! आयॅम द मॅन हू हॅज सीन द पास्ट! अँड हू कॅन सी द पास्ट! अँड विल सी द पास्ट इन फ्युचर! वर्तमानात मी भूतकाळ पाहतो.. आणि

भविष्यातही मी भूतकाळ पाहू शकेन! कारण मी आहे भूतकाळ बघू शकणारा एकमेव आर्कियॉलॉजिस्ट.. डॉक्टर प्रोफेसर मोहन बारशिंगे! जॅक्सन, तुला ठाऊक आहे मी कोण होतो आधी?

पार्वतीबाई बाहेर येतात ..

पार्वतीबाई : जॅक्सन .. तू इथे आहेस! तुम्ही आताच आलात का?

प्रोफेसर : थोडावेळ झाला. जॅक्सनांना भेटलो सर्व.. हो की नाही रे जॅक्सन?

पार्वतीबाई : बघा शेपूट कशी फेंदारलीय.. रागावलाय का लब्बाड..

प्रोफेसर : तो कसला रागावतोय.. थांब तुला काहीतरी महत्त्वाचे सांगतो..

पार्वतीबाई : काम संपले ना प्रिन्सिपॉलचे.. मग ठीक..

प्रोफेसर : मारो गोली टू प्रिन्सिपॉल .. त्या तिथे पलिकडे तिकडे .. जेव्हा तुझी नि माझी पहिलीच भेट झाली.. तिकडे गेलेलो मी..

पार्वतीबाई : अजून तो खड्डा तसाच आहे का हो?

प्रोफेसर : अगं विचारू नकोस..

(हातात कवटी घेत)..

पार्वती एकाएकी तरूण झाल्यासारखी होते..

प्रोफेसर : पारू .. पारू गं पारू .. बारशिंग्यांची पारू.. घर आयले तू घर आयले..

पार्वती : असं काय ते.. कुणी ऐकेल ना..

प्रोफेसर : ऐकू देत.. मी कुणाच्या बापास नाही भीत! ऐक! मी कोण.. तू कोण? मी हडप्पा मधला एक हडप्पी .. तू त्या जन्मीची माझी हडप्पीण ..

पार्वती : म्हणजे तेव्हा केलेली वटसावित्री .. इतके जन्म पुरतेय अजून ..

प्रोफेसर : इतके जन्म? तुला सांगतो.. हा पस्तीसावा जन्म .. मधले सारे जन्म दिसताहेत स्पष्ट मला.. हडप्पा मध्ये हडेलहप्पीत आपण मारले गेलो.. मग..

पार्वती : पूर्ण पस्तीस जन्मांचा हिशेब? नको गं बाई.. त्यापेक्षा मागचे एक दोन जन्म सांगा ना गडे..

प्रोफेसर : अरे वा! तू अशी लाजलीस की किती छान दिसतेस सांगू .. छत्तीसावा जन्म पण तुझ्याच बरोबर .. जन्मांतरीचे नाते आपुले ..

पार्वती : अय्या.. इश्श .. नकोच गाणे..

प्रोफेसर :

नकोच गाणे? नको तराणे?

पार्वती : खाऊ राया हो चणे फुटाणे!

प्रोफेसर : सखे म्हणूया गाणे दीवाणे

पार्वती : नको नको ते चणे फुटाणे!

प्रोफेसर : हेच! मागच्या जन्मी अशाच कविता केल्या नि लोकांनी जीव घेतला.. त्या आधी.. मी पाल..

पार्वती : मिस्टर पाल? बोंगाली बाबू?

प्रोफेसर : नाही! मी भिंतीवरचा.. छतावरूनही सरपटत जाणारा मी.. तो पाल नि तू माझी पालीण!

पार्वती : अय्या .. लाज वाटते ना गडे..

प्रोफेसर : तू अशी लाजलीस ना पालीण की तुझ्या पांढऱ्याफटक गालांवर अशी लाली येते सांगू ..

पार्वती : इश्श.. जॅक्सन बघतोय ना गडे..

प्रोफेसर : त्याला काय कळतेय यातले .. ऐक ना.. पुन्हा एकदा जाऊया छतावर.. तू छातपर आजा गोरिए .. पांढरी पालिए ..

पार्वती : भलतेच बाई तुम्ही चावट!

प्रोफेसर : वात्रट पण! अगं छतावर चिकटून उलटे लटकून चल .. आओ छतपर रोमान्स करे..

पार्वती : अगदीच सोडलीत लाज तुम्ही ..मनाची नाही तर जनाची..

प्रोफेसर : जना? तो त्या आधीचा जन्म .. मी व्हतो गणपतराव .. तू जनाबाईल.. म्हणजे माजी गावरान बाईल .. श्येतावर याची तू टोपलीत भाकरी घ्यून.. कांदा न भाकर न चटणी नि तांब्यातलं पानी..

पार्वती : काय तरी धनी.. जावा तिकडं..

पार्वती लाजते..

प्रोफेसर (भसाड्या आवाजात गात) : नको रानी नको लाजू ..
लाजं मदी नको भिजू..

पार्वती : जा.. जॅक्सन बघतात ..

प्रोफेसर : बघू देत.. आठवतेय तुला .. जनाबाई .. दळताना गायचीस तू ओव्या ..

पार्वती : आटवतात ना धनी..

माज्या गं या घरात.. एक गणपतराया..

देई देवा थोडी .. अक्कल त्याला ..

एकाएकी हातातून कवटी घेते..

पार्वतीबाई : अहो.. मि. बारशिंगे .. त्या जन्मीपण हीच मागणी होती माझी .. तरीही इतके जन्म तुमच्या बरोबर .. कधी येणार अक्कल मजला ..

प्रोफेसर : काय हे पार्वतीबाई, सगळ्या रोमँटिक मूडचा विचका केलात..

पार्वतीबाई : तो तुम्ही पहा मूड नि सूड..हलवा जरा बूड .. जॅक्सन चल आता उड.. आत चल.. सगळी कामं बाकी आहेत .. ती शकुंतला यायची आहे..

प्रोफेसर : कोण शकुंतला? कोण? शकुंतला? प्रत्यक्ष मेनका सुता?

पार्वतीबाई काही न बोलत कवटी घेऊन जायला लागतात. प्रोफेसर कवटी चपळाईने हातात घेतात नि आपल्या खोलीत निघून जातात.. पार्वतीबाई जॅक्सनला बकोटीला पकडल्यासारख्या पकडून आत जातात.

पाठून सूत्रधार :
पाहिलेत दिव्य ज्ञानप्राप्ती झालेले प्रोफेसर? आपली नि इतरांचीही जन्मकुंडली मांडून बसलेत ते. आता पुरातत्त्व शास्त्रज्ञाचे काम हे असे असते का? नसेलही! पण त्या शास्त्राचे प्रोफेसर मात्र गतकाळातील जन्मांबद्दल माहिती काढून त्या शास्त्रास पुढे घेऊन जायला निघालेत.. बारशिंगेच ते.. कधी शिंगे मोडून भूतकाळात शिरतील काय सांगता येते?

## प्रवेश २

प्रोफेसर आत अभ्यास करत बसले आहेत. समोर तीच कवटी. आजूबाजूला हाडं. बाहेर दरवाजावरची बेल वाजते. पार्वतीबाई आतून बाहेर येतात. दरवाजा उघडतात. शकुंतलाबाई आत येतात.

पार्वतीबाई : अगं शकुंतला! तू! किती वर्षांनी भेटतेस गं.. कशी आहेस?

शकुंतला : मी बरीय गं..

पार्वतीबाई : बस.. मी पाणी आणते.. की पिऊनच निघालीस घरून? नाही पुण्याची आहेस ना म्हणून विचारतेय ..

शकुंतला : कळतात बरं बोलणी .. पार्वती ..

पार्वतीबाई आत जातात. शकुंतलाबाई आजूबाजूला बघत बसतात. सगळ्या अँटिक नमुन्यांकडे निरखून बघतात ..

पार्वतीबाई : घे गं.

शकुंतला : छान.. किती जुन्या गोष्टी जमवल्यास ..

पार्वतीबाई : मी नाही गं. यांच्या सायटी मधून आणतात हे सगळे. जुने पुराणे नमुने .. घरभर भरलेत सारे..

शकुंतला : छान आहेत गं..

पार्वतीबाई : छान? जुनेपुराणे .. पुरातन वस्तू भांडार.. ते जाऊ देत.. तुझं कसं चाललंय? नवरा मिलिट्रीत आहे.. म्हणजे चांगलेच असणार.. आमचे हे.. खड्डयातून शोधूनशोधून आणतात काय.. तर हे सारे.. एक तो जॅक्सन आहे ना म्हणून ठीक..

शकुंतला : अगं दिसत नाही तो.. जॅक्सन?

पार्वतीबाई : झोपलांय गुलाम .. अंघोळ झाली की चांगला तीन तास झोपतो.. सवयच आहे त्याची ती..

शकुंतला : आणि साहेब दिसत नाहीत ते?

पार्वतीबाई : आहेत की.. आत आहेत. बघत असणार काहीतरी जुनेपुराणे कागद नि वस्तू ..

शकुंतला : चांगलेय गं. अगं ह्या जुन्या पुराण्या वस्तू काय भावात मिळतात माहितीय तुला? जेवढी वस्तू जुनी पुराणी तेवढीच किंमती..

पार्वतीबाई : काय विकायच्या गोष्टी? अगं स्वतःचा दात तुटला तर चालेल पण ह्या जुन्या पुराण्या कवट्यांतले दात तुटून नाही चालणार यांना.. जाऊ देत काय सांगू.. यांना सगळ्यात काही जवळच्या असतील गोष्टी तर ह्याच बरं.. आणि आता तो जॅक्सन .. म्हणाले ना मी मोहनजोधडी कोण असतो त्याचा अवतार आहे म्हणे या जन्मीचा.. म्हणून!

प्रोफेसर आतून बाहेर येतात. हातात कवटी आहे..

प्रोफेसर : पार्वती .. अगं पारू..

पार्वतीबाई : काय आहे हो.. बघा कोण आलंय..

प्रोफेसर : कोण? घोष? नाही तू म्हणालेलीस.. ती..

(शकुंतलेकडे पाहात) ओ हो.. वा! प्रत्यक्ष शकुंतला! मेनका सुता.. विश्वामित्र कन्यका .. प्रत्यक्ष शकुंतला..

(शकुंतलाबाई गोंधळतात)

प्रोफेसर : दुष्यंत कोठेय?

शकुंतला : अरे.. तुम्हाला कसा ठाऊक दुष्यंत?

प्रोफेसर : अर्थात .. तुम्ही त्याच शकुंतला.. आणि तुमचा तो दुष्यंत. मला स्पष्ट दिसतोय .. बरा आहे दुष्यंत? दुष्यंतरावांना आणले असतेत बरोबर ..

शकुंतला : अय्या दुष्यंतराव काय! तो कसला येतोय. बसला असेल घरी जिभल्या चाटत नी दूध पित ..

प्रोफेसर : जिभल्या चाटत?

शकुंतला : नाहीतर काय! दुसरा कसला उद्योग त्याला! आणि त्याला उचलून आणायचे म्हणजे कठीणच बाई..

प्रोफेसर : उचलून?

शकुंतला : हो ना. असा लब्बाड आहे ना. पण त्याला सोडून यायचे म्हणजे जिवावर येते हो..

प्रोफेसर : ते खरंच.. पण आले असते तर भेटले असते.. थेट महाभारत कालीन संदर्भ लागला असता हो..

शकुंतलाबाई अवघडतात. विषय बदलावा तसे म्हणतात..

शकुंतला : पार्वती, अगं हे द्यायचे राहिले .. अगदी ताजे मासे आहेत.. खातेस ना तू?

पार्वतीबाई : तुला अजून आठवण आहे म्हणजे! मासे म्हणजे माझी सर्वाधिक आवडती गोष्ट .. शाळेपासूनची..

प्रोफेसर : अरे वा! अगं थांब! साधा मासा नव्हे हा! याच माशाच्या पोटातून निघालेली अंगठी.. पाहू तुमचा हात..

(शकुंतलाबाई अवघडतात, प्रोफेसर उठून हातातील अंगठी बघू लागतात .. एकाएकी धावत आत जातात. भिंग घेऊन बाहेर येऊन परत अंगठी पाहू लागतात.)

प्रोफेसर : हुं.. नक्की नाही सांगता येणार .. कदाचित

असेल, कदाचित नसेल .. तुम्ही असं करा.. ठेऊन जा.. त्याचे कार्बन प्रिंट्स काढून पाहातो.. ती तीच पुराणकालीन अंगठी असणार ही..

शकुंतला : अहो नाही हो.. ही आम्ही पुण्यातल्या बागडे ज्वेलर्सकडे घेतलेली..

प्रोफेसर : बागडे .. यस्स .. बागडे! तोच तो ज्याला तो मासा मिळालेला.. त्याच्या पोटात अंगठी .. त्याच्या म्हणजे बागडेच्या नव्हे .. माशाच्या. दुष्यंत .. कोठेय दुष्यंत?

पार्वतीबाई : तुम्ही काहीतरी बोलू नका .. शकुंतला लांबून आलीय.. तुम्ही अभ्यास करा पाहू तुमचा ..

प्रोफेसर : प्रत्यक्ष महाभारत कालीन अवशेष जिवंत समोर दिसत असताना अजून वेगळा अभ्यास? जा ते मासे घेऊन जा.. दुष्यंतरावांच्या ह्रदयात शिरण्याचा मार्ग त्या माशाच्या पोटातून जातो बरे.. दुष्यंतराव आले असते तर आमच्या जॅक्सनला भेटले असते ..

शकुंतला : जॅक्सन? कसले काय.. कुत्र्याला घाबरतो तो.. मिशा फेंदारून धावत सुटतो..

प्रोफेसर : असं? का बरं? एवढा राजा.. कुत्र्याला घाबरतो? बरं आता काय करतात तुमचे मिस्टर?

शकुंतला : मिलिट्रीत आहेत..

प्रोफेसर : मिलिट्री? आर्मी मॅन आणि कुत्र्याला घाबरतात?

शकुंतला : अहो.. कुत्र्याला दुष्यंत घाबरतो..

प्रोफेसर : तेच! मिलिट्रीवाले कुत्र्यालाही घाबरायला लागले तर कठीण आहे.. एवढा मोठा राजा.. पराक्रमी .. कसा काय घाबरतो?

शकुंतला : अहो त्यात काय.. बोकाच तो घाबरायचाच..

प्रोफेसर : तुमच्याकडे नवऱ्याला बोका म्हणतात का हो?

शकुंतला : नवरा? नवरा तो नवरा आणि बोक्याला बोका म्हणतात. एव्हाना छतावर चढून उंदीर खात असेल तो..

प्रोफेसर : कोण? तुमचा नवरा?

शकुंतला : अहो, दुष्यंत. दुष्यंत म्हणजे आमचा पाळलेला बोका आहे. भारी लब्बाड हो..

प्रोफेसर : पण तुमचा नवरा उंदीर खातो? छतावर चढून? मिलिट्रीत हल्ली हे ट्रेनिंग देतात की काय? पण त्यांना आणले असतेत.. म्हणजे इकडे तशी उंदराची सोय केली असती..

पार्वतीबाई : अहो .. तो त्यांचा बोका आहे.. नवरा नाही..

प्रोफेसर : छे छे.. चुकलेच शकुंतला बाई.

शकुंतला : जाऊ देत हो.. होतात गैरसमज..

प्रोफेसर : हो ना.. गैरसमज होतात.. तुमचे त्या बोका दुष्यंताशी व्हायचे लग्न.. चुकलेच तुमचे.. गैरसमज आणि काय.. चुकून तुमच्या नवऱ्याशी झाले.. अगं

ते मासे.. नंतर बनव. मी जरा महाभारतकालीन स्वयंपाकघरावरचा माझा निबंध लिहितोय .. त्या माशाचा फोटो टाकतो त्यात .. मग बनव. नाहीतर फिशकरीतला मासा ओळखू नाही यायचा .. ती बोटातली अंगठी त्याच्याच पोटातली असणार .. ठेऊन जा.. अंगठी. दुष्यंताला मी समजावेन..

असो. लवकरच कुरूक्षेत्रात भांडी मिळालीत उत्खननात त्यावर ही निबंध लिहीन.. आलोच कॅमेरा घेऊन..

प्रोफेसर आत निघून जातात ..

पार्वतीबाई : हे असं आहे बघ बाई. मी काय म्हणे तर हडप्पा की कुठली तरी बाई.. जॅक्सन मोहनजोधडी.. तुझा बोका म्हणजे राजा दुष्यंत .. तू त्याची शकुंतला.. स्वतः ते कुठले तरी हडप्पा की घडप्पा.. मागे पाल होते..

शकुंतला : छि.. पाल ..

पार्वतीबाई : शीऽ नको करूस.. मी पण तेव्हा मिसेस पाल होती म्हणे ..

शकुंतला : काय की बाई..

प्रोफेसर हातात कॅमेरा घेऊन येतात. माशांची पिशवी उचलून आत निघून जातात..

पार्वतीबाई : आधी थोडे बरे होते. त्या कुठच्या कॉलेजच्या काय ते इन्फेक्शनला गेलेले..

शकुंतला : काहीतरीच.. इन्फेक्शन काय.. इन्जेक्शन असेल..

पार्वतीबाई : इन्जेक्शन? ते डॉक्टरलोक देतात ते. हे इन्फेक्शनच. मला इंग्रजी शिकवू नकोस. मॅट्रिकला तुझ्याहून चांगले दोन मार्क जास्त होते .. तुला छत्तीस..

शकुंतला : बरं बरं.. असेल काहीतरी.. पण आता काय करशील?

पार्वतीबाई : काय करते? आलिया भोगासी असावे सादर .. आणि काय! जॅक्सन गेट अपलास का रे बाबा? हाड खाण्याची टाइम झाली..

प्रोफेसर फोटो काढून कॅमेरा घेऊन बाहेर येतात ..

प्रोफेसर : वा! शकुंतलाबाई छान काम केलेत.. अगदी योग्य वेळी पुरावा आणलात.. किती निरागस दिसतोय हा मत्स्य .. त्याला ठाऊकही नसेल की पूर्ण इतिहास घडवण्यात त्याचा केवढा मोठा हात आहे.. मासा अंगठी गिळतो काय .. पण तुम्ही त्याचे सदैव ऋणी राहिले पाहिजे.. दुष्यंतराव त्याच्यामुळेच तर आले परत तुमच्याकडे! हो की नाही?

शकुंतला : हो ना!

प्रोफेसर :  बघ पार्वती, त्यांना पटलेय .. अहो हा विश्व प्रसिद्ध पुरातत्त्व शास्त्रज्ञ घरात आहे पण घरकी दाल.. मुर्गी बराबर!

प्रोफेसर आपल्या खोलीत निघून जातात

सूत्रधार : पाहिलंत .. कशी दिव्य दृष्टी प्राप्त झालीय प्रोफेसर बारशिंग्यांना.. बाराव्याच्या जोडीला तेरावे शिंग फुटले आणि प्रोफेसर तिरशिंग .. नव्हे तेराशिंगरावासारखे वागू लागलेत आता.. दिव्यदृष्टी त्यांना कुठे कुठे घेऊन जाते हेच पहा आता ..

## प्रवेश ३

शकुंतलाबाई आणि पार्वतीबाई दोघी गप्पा मारत बसल्या आहेत. जॅक्सन इकडे तिकडे फिरतोय.. बेल वाजते.. पार्वतीबाई दरवाजा उघडतात. घोष आणि त्याच्याबरोबर अय्यर म्हणजे त्यांच्या कॉलेजातला शिपाई दोघे आत येतात .. जॅक्सन ब्हो ब्हो करून भुंकायला लागतो..

पार्वतीबाई : जॅक्सन सायलेंट.. सायलेंट म्हणते ना.. या या. घोष.. साहेबांकडे काम आहे?

घोष : यस्स मॅडाम, साम बार्क बिथ सार.. ह्याट पेपॉर .. यल्लो वान .. आय हॅब टू सार्च हिअर ..

पार्वतीबाई : अहो.. बाहेर या. घोष आलेत..

प्रोफेसर बाहेर येतात. हातात तीच कवटी आहे. घोष कडे पाहात ..

प्रोफेसर : ओह! प्रोफेसर घोष! आणि अय्यर.. वेलकम!

घोष : सार द्याट पेपॉर .. यल्लो वान..

प्रोफेसर : ओह! याल्लो याल्लो डरटी फेलो! द्याट पेपर .. सोड रे!
सी आय कॅन सी दॅट.. पेपर इज गोइंग टू टेक अनदर बर्थ ..

घोष : बार्थ .. पेपॉर? सार आमि बूझिते पारी ना.. पेपॉर हॅज
लाईफ? अँड टू रिबॉर्न.. मीन्स आमादेर पेपॉर मारा गेलो?
पेपॉर डेड देन आमी ऑल्सो डेड! मारा गेलो.. प्रिन्शिपॉल
आमाके छोडबे ना..

प्रोफेसर : सोड रे घोष. इतक्या महत्त्वाचे सत्य कळतंय मला..
आणि तू पेपॉर पेपॉर करतोयस?..

बघ .. (अय्यर कडे पाहात) अँड अय्यर तू पण.. अय्यर..
नमस्कार.. (कमरेत वाकून नमस्कार करत) नमस्कार
अय्यर.. द फिफ्थ डिसेंडंट ऑफ मुथ्थुस्वामी..
मुथ्थुस्वामींचे वंशज.. व्हॉट अ ग्लोरिअस पास्ट!

घोष : हू मुथ्थुस्बामी?

प्रोफेसर : हू मुथ्थुस्वामी? मुथ्थुस्वामी. यू डोण्ट नो घोष.. बिग
गॉडली मॅन.. स्वामीजी .. लाइक विवेकानंद..

अय्यर : क्या सार आप मजाक उडाता गरीब का..

प्रोफेसर : मजाक? वह थोडी कोई पतंग है उडाने को? अय्यर.. पांच जनम पहले .. तामिळनाडू केरला बॉर्डरपर.. स्वामी मुथ्थुस्वामी अय्यंगारा .. तुम वोहीच मुथ्थुस्वामी..

अय्यर : अय्यो .. सच बात सार?

प्रोफेसर : ऑफकोर्स. आय कॅन सी दॅट व्हेरी क्लियरली.. आणि नेक्स्ट .. नंतर अय्यर तू एका मंदिरात हत्ती होतास..

घोष : हत्ती? कि बोलछी? एलिप्हांट? विथ द्याट ट्रंक अँड ऑल..

प्रोफेसर : घोषबाबू.. ओके.. आफ्टर सो मेनी इयर्स ऑफ इव्होल्यूशन.. बट बिना सोंडेचा हत्ती काही जनरेशन्स पूर्वी होता? देअर इज नो प्रूफ.. अरे मी पेपर प्रेझेंट केला होता आर्कियॉलॉजी कॉन्फरन्स मध्ये .. कंपॅरिझन ऑफ एन्शंट कॅमल्स विथ एलिफंट्स.. त्यातही रेफरन्सेस आहेत.. बट नो वन विदाऊट अ ट्रंक..

घोष : यस्सार, आय नो.. सो धिस बगर बॉज ए स्बामी?

प्रोफेसर : मुथ्थुस्वामी. नॉटॅन ऑर्डिनरी वन.. टेंपल वन.. सेक्रेड ..

घोष : एलिप्हांट इन केरला हॅज टू बी सो प्रोफेसर बार्शींगे ..

प्रोफेसर : अँड दॅट एलिप्हांट .. आय मीन हत्ती लिव्हड् फाॅर हंड्रेड इयर्स.. आय कॅन सी.. मंदिरातला हत्ती .. राॅयल

वन.. पाठीवर सोन्याची जरतारी असलेली झूल.. आणि सुपासारख्या कानात हिऱ्यामोत्यांचे डूल ..

अय्यर : क्या साब.. हम गरीब का मजाक.. हम चोटा आद्मी साब..

प्रोफेसर : तुम छोटा? नहीं अय्यर.. तुम मोटा.. मोठा.. बादमें.. हत्ती के बादमें तुम बना नारियल का झाड.. केरला में क्या कमी नारियल की.. पण तुम उधर था.. पचास वर्षे..

घोष : अय्यर.. यू वेअर अ ट्री? नेब्हार हर्ड अ म्यान एब्हर बॉज अ ट्री इन पास्ट लाईफ.. कल को तुम कोई फथ्थर था बोलेगा.. आमि तो सर्प्राइज्ड आच्छी.

अय्यर : छींक आता जी सार.. घोषसार..

घोष : वो छींक ना.. सर्प्राइज आच्छी आमी..

प्रोफेसर : अँड जस्ट लास्ट वन.. मागच्या जन्मी अय्यर वॉज प्रिन्सिपॉल ऑफ अवर कॉलेज ..

घोष : व्हॉट? ही वॉजे प्रिन्शिपॉल सार..

अय्यर : क्या सार.. हमारा मजाक करता .. हम गरिब आद्मी.. हम प्रिन्सिपल सार.. और प्रिन्सिपल भरूचा क्या प्यून?

प्रिन्सिपॉल भरूचा आत येतात ..

भरूचा : ओह! यू ऑल स्टील हिअर? व्हेअ इज द पेप? घोष.. दॅट युनिव्हर्सिटी पेप? मी टुला काय विचारते? पिला पेपर कुटे असते?

घोष : बुई आर सार्चिंग सार..

प्रोफेसर : नो.. सर नॉट दॅट पेपर .. वुई आर सर्चिंग फाॅर इटर्नल ट्रूथ.. सर आम्ही पूर्व जन्मीचे अवतार शोधतो आहोत. अँड डोन्ट वरी.. पेपराचा पुनर्जन्म होईल.. मग मला त्याचा पूर्वावतार दिसेल.. कारण आयॅम द मॅन हू कॅन सी द पास्ट! सर आर्कियॉलॉजीतला मेजर मेजर ब्रेक थ्रू..

भरूचा : ब्रेक थ्रू? ब्रेकडाऊन होते साला पेपर नसते तर. टू काय रे बकबक करते.. तो पेपर नसणार तर व्हाइस चान्सलर माजी हजामत करणार .. साला ते पेपर शोद जल्दी..

प्रोफेसर (भरूचाकडे पाहात) : मुंगी! सर एका जन्मात तुम्ही मुंगी होतात ..

घोष : व्हाईट अँट?

अय्यर : ओल्ड जनरेशन सार.. ब्लॅक अँड व्हाईट वोन्ली .. नो कलर.. नॉट रेड अँट..

प्रोफेसर : राईट अय्यर.. नॉट व्हाईट .. ब्लॅक अँट!

भरूचा : नो नो.. नो ब्लॅक ऑर व्हाईट.. यल्लो.. साला पिवळा पेपर शोद ने..

प्रोफेसर : अँड लास्ट जन्म .. सर यू वेअर द प्यून इन धिस कॉलेज.. व्हेन अय्यर वॉज प्रिन्सिपॉल ..

भरूचा : एक्सचेंज ऑफ रोल्स?

जॅक्सन भरूच्यांच्या अंगावर उड्या मारायला लागतो..

भरूचा : ओह! धिस डॉगी.. सो क्यूट.. डॉगी डिक्रा जरा काम करू दे ने समद्याना.. साला तो पेपर मिळते नाय..

प्रोफेसर : सर! यू नो व्हाय जॅक्सन इज जंपिंग?

भरूचा : व्हाय? त्याला पेपरचा वास येते काय? ते शोदते पेपर? स्नीफर डॉग हाय काय? तर माज्यावर जंप कशाला मारते?

प्रोफेसर : नाही सर.. बिफोर यू वेअर द प्यून.. यू वेअर मिसेस जॅक्सन! इन दॅट बर्थ! आय कॅन क्लिअरली सी दॅट! इट्स इटर्नल लव्ह! जॅक्सन स्टिल रिमेंबर्स यू..

भरूचा : मी? मिसेस जॅक्सन?

प्रोफेसर : त्या जन्मी.. ओह! नाऊ आय रिमेंबर.. सर एक्स्क्यूज मी.. कालच्या पेपरात तो बर्थ चा पॉइंट लिहायला विसरलो.. आय विल जस्ट कम..

प्रोफेसर त्यांच्या स्टडीरूम मध्ये जातात.

पार्वतीबाई : बघा ना सर.. ते तिकडून आल्यापासून असेच करताहेत..

भरूचा : डीप इन हिज आर्कियॉलॉजी!

घोष : अय्यर वॉज एलिफ्हांट..

अय्यर : अँड प्रिन्सिपॉल सार वॉज अँट!

शकुंतला : आणि मला ती पुराणकालीन शकुंतला म्हणे! आणि माझा बोका म्हणजे माझा नवरा!

भरूचा : मी काय म्हणते .. ह्याचा स्क्रू थोडा ढिला ज्हाला मला वाटते..

घोष : यू आर राइट सार.. बुई विल कॉल कारपेंटर..

भरूचा : साला तुजा भेजा क्नी जाॅइंटमदी असते काय? ते काय फर्निचर असते?

अय्यर : पॉसिबल सार.. लास्ट बर्थ.. सार कॉलेजका बेंच होएंगा तो..

घोष : क्वाएट पॉसिबल..

भरूचा : अय्यर.. वुई नीड टू ट्रीट इन धिस बर्थ. वुई नीड टू कॉल अ डॉक्टर..

पार्वतीबाई रडायला लागतात ..

भरूचा : बाई, वरी नॉट. माज्हा दोस्त असते .. डॉ. वाग्ह. त्याला बोलावते ..

घोष : डॉक्टर बाघ? ही इजे ॲनिमल्स डॉक्टर ..

भरूचा : सो व्हॉट! माणस पण एक प्राणीच असते ने!

अय्यर : अँड सार.. सम लास्ट बर्थ .. सार प्राणीच असणार .. सम कॅमल

घोष : ऑर डायनोसॉर..

भरूचा : अय्यर, घोष .. टॉक लेस.. वर्क मोअर! कॉल वाग्ह .. इमिज्येटली.. बोल नौशेरजी बोलावते ..

अय्यर : यस सार..

अय्यर फोन करू लागतो..

अय्यर : टायगर डॉक्टर इज देअर? व्हॉट? वाघ? चलेंगा .. नौशेरजी भरूचा .. अर्जंट काँटॅक्ट.. वो के.. जस्ट अ मिनट .. सार.. आप ही बोलो ..

भरूचा (फोनवर): साला डागदर वाग्ह .. जरा अर्जंट ये ना इकडे. एक ते माणसं हाय.. डोका आऊट तेचा.. नि आमचा बी. टू प्राणीलोकांनचा डागदर.. ठावक हाय.. टू ये नी.. ते बेहोश करायचा दवाई घ्यून ये.. जल्दी .. साला टू वाग्ह नि आदमीला काय डरते? मी हाय ना.. धावत ये.. नायतर घोडा कुनी आला असेल पेशंट म्हणूनशान तर तेच्यावर बसून ये.. जलदी ..

घोष : ताडाताडि एखून ..

शकुंतला : ठीक होतील ना गं तुझे मिस्टर? मला तर बाई टेन्शन ..

पार्वतीबाई परत गळा काढतात..

भरूचा : तुम्ही बायडी लोग जरा शांत बसा नी.. स्पेशालिस्ट डागदर इज कमिंग .. जरा बसते इथे.. अरे घोष तो साला यल्लो पेपर .. तेच नसेल ना तर तुजी पन सुट्टी आन माजीपन ..

घोष : सार्चिंग सार.. बट आय वोण्ट डिस्टार्ब बार्शींगे सार.. व्हॉट इफ ही गेट्स अनादर अट्याक.. बाबा रे बाबा ..

भरूचा : तो डागदार वाग्ह यून ग्येला की मंग सर्च कर.. बेस नी..

**प्रवेश ४**

सगळे थकून रिकाम्या जागी बसलेत .. नि पेंगताहेत.. आत प्रोफेसर सगळे विसरून लिहित बसलेत.. भरूचांचा चक्क घोरण्याचा आवाज येत आहे. जॅक्सन इकडे तिकडे भटकतोय.. थोड्यावेळाने जॅक्सन खुर्चीचा पाय पाहून तंगडी वर करतो.. घोषची पँट ओली व्हायला नि डॉक्टर वाघ आत शिरायला एकच गाठ पडते..

घोष "उडी बाबा.. इजिट रेनिंग" म्हणत उठतात.. डॉक्टर वाघ "व्हेअर इज दी पेशंट" म्हणून आत शिरतात.. सगळे एकाएकी जागे होतात ..

भरूचा : अरे वाग्ह तू आला ने.. मिसेस बारशिंगे डोन्ट वरी नाऊ.. चार पग वाल्याला पण हा डागदर सुधारणा करते.. तुझ्या हजबंडला तर दोनच पाय असते.. थोडा गाढवपणा करते ते पण हाय तर माणसच. हा वाग्ह कसा इलाज करते बग तू.. हो की नाय वाग्ह?

वाघ : पण झालंय काय ते तर सांगा.. आणि पेशंट कुठाय?

घोष : ना बाबा ना.. पेशांट इज इन्साईड.. बाट डोन्ट कॉल हिम आऊट..

अय्यर : सही बोल्ताय सार..

भरूचा : ते तिकडे आत बसून लिहित असते बारशिंगे .. टू त्याला बाहेरूनच बघते तर..

वाघ : डोन्ट वरी! आय हॅव ट्रीटेड टू चिंपांझीज लास्ट वीक..

घोष : बाट ह्याब यू ट्रीटेड रॅबिड डॉग?

भरूचा : समदे गप.. वाग्ह.. हे प्रोफेसर है ने ते कोणालाही पाहून त्याचा पास्ट सांगते!

वाघ : उलटा ज्योतिषी?

भरूचा : अरे, मागचा जनम सांगते.. मी काली मुंगी होते अन हा अय्यर एलिफंट होता म्हणतो बारशिंगे ..

वाघ : कधीपासून होतेय सगळे?

शकुंतला : मी आले तेव्हा पण..

वाघ : तुम्ही मिसेस बारशिंगे ..?

पार्वतीबाई : नाही नाही.. मी. ते तिकडे कुठल्यातरी इन्फेक्शनला जाऊन आले नि हे असं झालं.. (रडू लागते)

शकुंतला : उगी उगी पार्वती .. डॉक्टर आलेत ना आता?

वाघ : आधी त्यांना बाहेर बोलावू..

भरूचा : हे पा वाग्ह.. त्याला तिथेच बेहोष कर नी.. मग बघू ..

वाघ : अरे, मागच्याच आठवड्यात नॅशनल पार्कात वाघ पकडलाय मी. धिस इज नथिंग! बाहेरून तर पाहतो ना पेशंट ..

सगळे वाकून पाहू लागतात. त्यात डॉ. वाघ सर्वात मागे!

भरूचा : ते लिहिते पा कसा द्ह्यान द्यून. हुशार हाय साला पन डोका आऊट..

घोष : यस्सार ..

शकुंतला : पार्वती आता कसं गं होणार तुझं..

पार्वती परत भोकाड पसरते

भरूचा : साला वाघ.. तू कसा काय नाय बोलते ते..

वाघ : तुमचे ते प्रोफेसर दर्शन आटोपले की सांगा ..

भरूचा : अरे साला घोष अन अय्यर.. ते वाघला बगू देते की नाय टुमी लोग? गांडा लोग .. ये वाघ.. बघ टू टुजा पेशंट ..

बाकी मागे जातात. वाघ आणि भरूचा उभे राहतात ..

वाघ : नौशिर, इट्स डेंजरस.. लास्ट टाईम एक गेंडा असाच बसलेला ..

पार्वतीबाई : (रडत) गेंडा?

भरूचा : ताई टुमी रडते नाय.. हा वाघ लय हुशार हाय.. हो की नाय?

वाघ : तर व्हॉट आय विल डू इज.. व्हेअर इज माय गन?

घोष : उडी बाबा .. गोली मारेगा?

अय्यर : अय्यो .. साब को एक बार देकने का है.. अंतिम दरशन .. अच्चा था.. थोडा पागल हुवा लास्ट में पन.. अच्चा था.. लास्ट वीक में मेरे बेटेको कॅडबरी दिया था ..

शकुंतला : दिवसमान खराब बाई. कधी काय होईल सांगता येत नाही ..

पार्वतीबाई (रडायला लागतात) : जॅक्सन तुझे साहेब..

भरूचा : टुमी लोग पागल छे के? साला अंतिम दरशन केम? चुप समदे लोग. पिन ड्राॅप सायलन्स ..

वाघ : हे बघा, मी इथून टारगेटवर निशाणा साधतो. टारगेट बेशुद्ध होऊन पडले की वुई विल गेट हिम आऊट..

भरूचा : ते बेहोषीचा इंजेक्शन वाघ?

वाघ : यस्स. आयॅम ॲन एक्स्पर्ट .. आय विल शूट.. द डार्ट .. विल हिट हिम.. ही विल फा◌ॅल अस्लीप .. मग पुढे बघू.

भरूचा : यू आर द बेस्ट जज वाघ..

पार्वतीबाई : जज्ज? हे जज्ज आहेत की डॉक्टर?

शकुंतला : टू इन वन असतील.. वाघ नावाचा माणूस असतो तर जज डॉक्टर असू शकतो पार्वती ..

डॉक्टर वाघ प्राण्यांना बेशुद्ध करायची बंदूक लोड करतात मग नेम घेऊन चाप ओढतात. प्रोफेसर टेबलावर डोके ठेऊन गाढ झोपल्यासारखे पडतात..

वाघ : नाऊ टारगेट इज अन कॉन्शस..

भरूचा : साला तेला उचलून बाहेर ज्होपव.. अय्यर, घोष.. गो अँड पिक हिम अप. इकडे आणून ज्होपव तेला..

अय्यर आणि घोष प्रोफेसरांना उचलून बाहेरच्या सोफ्यावर झोपवतात. डॉक्टर वाघ स्थेस्थोस्कोप घेऊन डोक्यावर ठेऊन तपासू लागतात ..

वाघ : भंगीर.. खूपच भंगीर!

शकुंतला : गंभीर म्हणायचे का तुम्हाला?

वाघ : तेच! तुम्ही ऐकले ना? काय आहे आम्ही गंभीर आहे पेशंट म्हटले की नातेवाईक ऐकून न ऐकल्यासारखे करतात. म्हणून मुद्दाम भंगीर म्हणतो मी. मग ते करेक्ट करताना नातेवाईक आम्हाला सांगितलेच नाही म्हणू शकत नाहीत नंतर.. तर सिच्युएशन इज सीरियस! मेंदूमध्ये काहीतरी प्रॉब्लेम झालाय!

पार्वतीबाई : म्हणजे? बदलावा लागेल? नवीन मेंदू?

शकुंतला : काहीतरीच पार्वती तुझं. मेंदू काय बदलता येतो? बदलता येतात त्या गुडघ्यातल्या किडण्या! होय की नाही डॉक्टर?

वाघ : हे बघा. मेंदूत बिघाड झाला आहे.. आता बेहोष आहेत प्रोफेसर. जेव्हा उठतील तेव्हा नक्की अंदाज येईल.. एका डायनोसॉरला मी दिलेली ही ट्रीटमेंट ..

भरूचा : साला वाग्ह. तू या लोगानला काय पण सांगते! साला डायनोसॉर एक्स्टिंक्ट हून कित्ती बद्धा वर्स ज्हाला ..

प्रोफेसर डोळे उघडत..

प्रोफेसर : डायनोसॉर? यस्स .. आय थिंक गॉट इट! ती हाडं दशलक्ष वर्षापूर्वीची.. डायनोसॉरची असणार .. थांबा.. लेट मी नोट दॅट.

प्रोफेसर उठून धावतच स्टडी रूम मध्ये जाऊन लिहायला लागतात .. सगळे डॉक्टर वाघांकडे पाहू लागतात ..

भरूचा : साला ते तर लगेच उठून गेला रे वाग्ह ..

वाघ : डोस कमी पडला असेल.. परत एक डोस देतो..

वाघ परत गन लोड करतात. उभे राहतात. नेम घेऊन. तोच प्रोफेसर उभे राहतात .. त्या बंदुकीसमोर उभे राहतात ..

प्रोफेसर : पार्वती .. हा शिकारी शंभू कुठून आला इथे?

वाघ : शिकारी? शिकारी शंभू?

भरूचा : प्रोफेसर बार्शिंगे .. साला टू बाहेर येते की नाय?

प्रोफेसर : यस्सर .. कमिंग ..

घोष : अरे सार .. उडी बाबा .. की बोलछी ..

अय्यर : अय्योय्यो.. अब नया और कुच सुनाएगा सार.. हम पीछले जनम में कछुआ था की और कुच..

शकुंतला : काय की बाई.. कसं होणार पार्वती तुझं..

प्रोफेसर बाहेर येतात ..

प्रोफेसर : काय शिकारी शंभू? वाघ की वाघोबा? बंदुकीची गोळी कसलीय? दहा मिनिटांत खेळ खत्म? अहो वाघ डॉक्टर मला स्पष्ट दिसतेय .. अकबराच्या दरबारात होतात तुम्ही .. मियां शरीफ.. बादशहा सलामत ना सलामत ठेवायसाठी सलाम ठोकत दवादारू करायचे.. तिकडून मग डायरेक्ट. स्वराज्यात.. हंबीरराव मोहिते पाटील.. पुरंदरच्या युद्धात मारले गेले.. तिकडून माथेरानला .. घोडा.. चार पायावर.

एके दिवशी बसला तर मालकाने थेट गोळ्या घातल्या.. मग ब्रिटिशांच्या राज्यात मुंबईला चीफ पोस्ट मास्टर .. मग एक तेरड्याचे झाड.. तीन दिवस! नंतर वाघांच्या घरी! वाघोबा! आता निघा! जंगलातले वाघ पकडायचे ना .. अगं जॅक्सनला तपासून घे एकदा .. जॅक्सन .. खोकून दाखव काकांना..

जॅक्सन आतून भुंकत बाहेर येतो..

प्रोफेसर : डू आ.. टंग दाखव.. टंग ..

जॅक्सन जीभ दाखवत उभा राहतो. वाघ त्याच्या घशात टॉर्चचा उजेड पाडत उभे राहतात ..

वाघ : मी गोळ्या देतो त्या ह्याला तीनदा द्या. आणि तीन दिवस भुंकणे बंद! व्हॉइस रेस्ट म्हणतात त्याला. मागच्याच आठवड्यात एका सिंहाचा असाच आवाज बसलेला.. त्याला डरकाळी फोडायला मनाई केली.. चार दिवसात ओ के!

पार्वती : बरे झाले बाई तुम्ही आलात..

वाघ : आलात .. आता गेलात होत आहे. नौशिर.. मी चाललो.. तू बघ काय करायचे ते.. नाहीतर हे साहेब अजून भूतकाळ शोधून काढायचे..

भरूचा : अरे वाग्ह.. साला थांब नी..

वाघ न ऐकता आपली बॅग नि गन उचलून पटकन निघून जातात..

भरूचा : प्रोफेसर बारशिंगे.. टू साला तबियत बरी होईपर्यंत यू नको.. घोष विल मॅनेज..

घोष : यस्सर .. आय बिल ..

भरूचा : लेट्स् गो.. तो यल्लो पेपर .. विल डू समथिंग.. विल सी.. चलो. ताई जरा प्रोफेसरला सांभाळजो..

घोष, अय्यर आणि भरूचा निघून जातात ..

शकुंतला : पार्वती मला पण निघावे लागेल.. सांभाळ गं बाई.. जॅक्सन .. टाटा..

शकुंतलाबाई आपली बॅग घेऊन निघून जातात. जॅक्सन प्रोफेसरांच्या मांडीवर चढून बसतो.. पार्वतीबाई आत निघून जातात. जॅक्सनला कुरवाळत प्रोफेसर बसून राहतात .. हळूहळू अंधार होतो.

**प्रवेश ५**

(दोन वेगवेगळे शेवट आहेत

शेवटचा प्रवेश..  शेवट अ)

प्रोफेसर जॅक्सनशी खेळत बसलेत. आतून पार्वतीबाई येतात .. जॅक्सन धावत त्यांच्याकडे जातो..

पार्वतीबाई : काय मग? कशीय तब्येत?

प्रोफेसर : कुणाची?

पार्वतीबाई : कुणाची काय .. तुमचीच ..

प्रोफेसर : पारू.. मला काय भरलीय धाड?

पार्वतीबाई : धाड? मग काल केलेत ते काय?

प्रोफेसर : काय? मी काय केले?

पार्वतीबाई : काय केलेत? सगळ्यांना टेन्शन दिलेत ते?

प्रोफेसर : कुणी? मी?

पार्वतीबाई : नाही .. मी.

प्रोफेसर : हां. ते शक्य आहे..

पार्वतीबाई : काय ते पूर्वजन्मीचे अवतार काय.. मी पाल.. अय्यर काय तर मुथ्थुस्वामी.. तुमचे प्रिन्सिपॉल सर काय तर म्हणे..

प्रोफेसर : ते? थोडीशी गंमत गं..

पार्वतीबाई : अशी आणि गंमत?

प्रोफेसर : बघ .. फसले ना सगळे. अगदी गुरांचा डॉक्टर बोलवावा लागला! अकबराचा पर्सनल फिजिशियन!

पार्वतीबाई : म्हणजे? तुम्हाला सगळे आठवतेय?

प्रोफेसर : आठवते म्हणजे? मुद्दाम केलेले विसरणार कसे?

पार्वतीबाई : बाई बाई.. हद्द झाली तुमची.. मुद्दाम? इकडे आमचा जीव वरखाली होत होता.. आणि तुम्ही पाल.. मी पालीण..?

प्रोफेसर : सांगू गंमत..

पार्वतीबाई : असली कसली मेली गंमत? जॅक्सन तो मोहनजोधडी अवतार?

प्रोफेसर : सांगू? सुरूवातीपासून सांगतो ..

पार्वतीबाई : सांगू विचारताय?

प्रोफेसर : अगं पहिल्यांदा जे तीन जॅक्सन दिसले ना तो खराखुरा भास होता. रात्रंदिवस तेच तेच विचार केले तर दिसणारच सगळीकडे तेच. त्यात तू जॅक्सनचा विषय काढलास..

पार्वतीबाई : म्हणजे तो मोहनजोधडी जॅक्सन ..?

प्रोफेसर : अर्थातच नाही .. तुला जॅक्सन पाळायचा होताच.. तुझा हट्ट होता.. मी आपली गंमत केली होती. एखादा पूर्वज असा अवतरेल असे मानण्याइतका मी मूर्ख आणि अवैज्ञानिक नाही.. ती पाल आणि पालिणीची गंमत तू गंभीरपणे घेतलीस.. त्यात ती शकुंतला आली.. ती कमी की काय.. तिच्याकडे चक्क दुष्यंतही निघाला नि त्या पुराणकथेतला मासाही आणला तिने! तुला माहितीय ना ती दुष्यंताने शकुंतलेला दिलेली अंगठी मासा गिळतो ती गोष्ट? नसेल तर वाच! आणि घोष अय्यर आणि भरूचासर आले तेव्हा तर हाच एक उपाय होता! ते युनिव्हर्सिटीचे पेपर हरवलेले. बिचारे प्रिन्सिपॉल ही हवालदिल .. त्यातून बचावण्याचा हाच एक उपाय होता..

पार्वतीबाई : हा? आणि उपाय?

प्रोफेसर : अगं राजकारण्यांकडून शिकावे.. एक प्रा ॅब्लेम कमी करायचा असेल तर तो सुटो न सुटो .. दुसरा त्याहून मोठा

उभा करायचा.. पहिल्याचा विसर पडतो! आता सर शोधतील दुसरा उपाय त्या पेपर्स साठी. आणि बहुतेक घोषही बचावेल!

पार्वतीबाई : म्हणून हे असे सगळे? आम्ही काय घाबरलेलो.

प्रोफेसर : म्हणून चक्क गुरांचा डॉक्टर बोलावलात? सगळे ऐकत होतो मी आतून.. मेंदूत गडबड म्हणे!

पण एक फायदा झाला.. साहेबांनी तब्येत ठीक होईतोवर सुट्टी दिलीय.. तोवर सगळे लिखाणाचे काम संपवतो.. चार पाच दिवसांनीच जाईन कॉलेजला ..

पार्वतीबाई : आणि विचारले साहेबांनी ठीक कसे झालात तर?

प्रोफेसर : सांगून टाकेन.. डॉक्टर वाघांनी जॅक्सनला दिलेल्या गोळ्या मी घेतल्या म्हणून! पण एक मानले पाहिजे .. मी काहीही बोलत होतो तेच वैज्ञानिक सत्य असल्याची अंधश्रद्धा तरी कोणी नाही दाखवली .. नाहीतर आजकाल काय.. कुठल्याही गोष्टीला वैज्ञानिक मुलामा देऊन अवैज्ञानिक गोष्टी खपवल्या जातात.. तेवढे तरी नाही केले या लोकांनी .. नाहीतर मी सांगतोय काहीतरी म्हणून माझा बारशिंगे बाबा बनवला असता या लोकांनी!

पार्वतीबाई : काही पण बोलू नका. नसती गंमत म्हणे.. इकडे आमचा जीव जायची वेळ आलेली.. चला मी कामाला लागते ..

पार्वतीबाई आत जातात. प्रोफेसर जॅक्सनशी खेळता खेळता हाक मारतात ..जॅक्सन .. जॅक्सन ..

पाठोपाठ मायकल आणि मोहंजोदडोतला जॅक्सन येऊन उभे राहतात ..

मायकल : (किंचाळून गातो)

डिड यू कॉल मी
कॉल मी सर..
आयॅम ॲट युवर
सर्व्हिस सर सर्व्हिस सर..

मोहंजोदडी : वँक वॅक टुं कुंग ..

कँक कॅक ट्यांव टर ट्यांव टर..

जॅक्सन ब्हो ब्हो म्हणून भुंकतो.. दोघे जॅक्सन दिसेनासे होतात .. प्रोफेसर जॅक्सनच्या डोक्यावर हात फिरवत बसून असतानाच पडदा पडतो.

**प्रवेश ५:**

(शेवटचा प्रवेश.. शेवट ब)

पाठून सनई वाजतेय .. पाठोपाठ हळू आवाजात स्वामी अतीतानंदांची आरती वाजते ..

जय जय जय स्वामी अतीतानंदा
पूर्वजन्मीचा देशी अतीव आनंदा..

बघूनिया नुसताच तू सांगशी भूतकाळा
नाही तुजला क्षिती कसलीच कळिकाळा..

भावभक्तिने येती शरणागत कोणी
राहती जन्मोजन्मी तुझेच ऋणी..

तुज भक्तिसाठी घेऊ जन्म ही कितीदा
मागील जन्मीचा हिशेब सांगशी अतीतानंदा..

**पाठून आरतीची रेकॉर्ड वाजत असतानाच..**

स्थळ तेच.. प्रोफेसरांचे घर. त्यांच्या स्टडी रूममध्ये भरूचा, घोष, वाघ उभे राहून बोलताहेत. बाजूच्या हॉलच्या दरवाज्याबाहेर मोठाली रांग.. अय्यर उभा राहून लायनीला शिस्त लावतोय.

इकडे हॉल मध्ये मोठा बोर्ड..

श्री स्वामी अतीतानंद..

प्रथम वर्ष अवतरण वर्धापन दिन सोहळा

प्रसाद वितरण

आत प्रोफेसर सिंहासनासारख्या खुर्चीवर बसलेत. समोर पार्वतीबाई बसलेल्या, आधी लंकेची पार्वती असणाऱ्या आता लक्षात येईल इतक्या दागिन्यांनी मढलेल्या आहेत. बाजूला शकुंतलाबाई, मांडीवर दुष्यंताला घेऊन. जॅक्सन आता मोठा झालाय एका वर्षाने.. तो फिरतोय.. एक एक भाविक आत येतोय.. प्रोफेसर काही सांगताहेत.. भाविक पाया पडतोय.. दक्षिणा

टाकतोय.. निघून जातो.. त्या बोलण्याचा काहीच आवाज नाही. फक्त तोंड हलवलेले दिसते आहे..

आरती संपल्यावर इकडे स्टडीरूम मध्ये भरूचा, वाघ आणि घोष बोलत आहेत.. एकमेकांशी ..

भरूचा : साला एक वरीस झाला वाग्ह. काय साली गंमत. हे अतीतानंद स्वामी एकदम पॉप्युलर हाय समदीकडे ..

वाघ : नौशिर, तुझं डोकं भन्नाट साल्या. तू प्रिन्सिपॉल कसला, बिझिनेस मॅन व्हायचास ..

भरूचा : ते तर आपण हायेच .. ते वैनीबाय मानली म्हणून. एक वर्षात प्रोफेसर साला स्वामी बनला .. आपणलोक पन साला मालामाल ज्हाला..

घोष : राईट सर.. आय रिमेंबर सार, बार्शींगे सार बिलिव्हस दॅट जॅक्सान इज मोहंजोदडोज जॅक्सान्स इन्कारनेशन.. इट स्टार्टेड विथ द्याट!

भरूचा : साला समदी जॅक्सनची किर्पा हाय म्हंजे .. मोहंजोदडोत होता की नाय जॅक्सन गॉड नोज.. पन आपण लोगानला हा जॅक्सन पावला नाय का वाग्ह?

वाघ : खरंय नौशिर.. तो जॅक्सन आणि ह्या जॅक्सन ची कृपा आणि काय!

भरूचा : सच्ची साला! जॅक्सन अने जॅक्सन!


आवाज बंद होतो. एकेक भाविक प्रोफेसरांच्या पाया पडतो .. निघून जातो. गर्दी संपतच नाही.. अय्यर लाइन मॅनेज करतोय.. भरूचा वगैरे बोलताहेत ..


सगळीकडे अंधार होऊ लागतो.


स्वामी अतीतानंदांच्या बोर्डवर फक्त प्रकाश राहतो.. हळूहळू तेथेही अंधार होतो..

डॉ. नितीन मोरे यांची २८ प्रकाशित पुस्तके


यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल.










































डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे

राजा दरबारी
डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच

डॉ. नितीन मोरे
आधुनिक कहाण्या

डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे
घरात

डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे
एकपात्री नाट्यछटा
सांगतो ऐका

डॉ. नितीन मोरे
केल्याने

डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे

## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे तेरावे वर्ष.

## डॉ. नितीन मोरे यांचे हे एकोणतिसावे पुस्तक.

डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक टवटवी असते. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, स्तर सोडत नाही. समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(९), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ.

नितीन मोरे (२८), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (७), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१९), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(९), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।